# उंटाचे साहस

दानीएल व त्याच्या मित्रांबरोबर साहसी होणे




मुले महत्वपूर्ण आहेत कडून

सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळा (व्हीबीएस)

निर्देशकाची हस्तपुस्तिका

संकेत स्थळ: childrenareimportant.com/camel

## “मुले महत्वपूर्ण आहेत” च्या संपूर्ण चमूचे आभार!

**Founders,** Dwight y Kristina Krauss

**Creative Team Manager,** Flor Boldo

**Creative Editorial Team,** Jennifer Sánchez, Areli Salinas, Ramón Martínez, Marlon Hernández.

**Designer,** Julio Sánchez

**Contributing Designer** Suzanna Kangas (Suki)

**Consulting Emeritus,** Miguel y Vickie Kangas

**Facebook Page Spanish Admin,** Ramón Martínez and Verónica Toj

**Facebook Page English Admin,** Marlon Hernández and Flor Boldo

**Translation Team,** alineviera, Annupama Wankhede, Anton Klymyk, Araz Mammadzadeh, Aroma Publications and Media, Arturo Jr Boron, Blessy Jacob, Carmela Dawn Flores, Chrisbresnahan, David Raju, Ephraim Njuguna Mirobi, Finny Jacob, Geenav, HamidReza Azimi (hamid.azimi1364 at gm#ail com), Heyaudrey, I-clever.com, iqbalman, Jacob Kuruvilla, kamilturk, Karunguru Mwangi, kiran, Maitrayi Mondal, Marco Chu, Marcos Rocha, Mathew Das, Mitesh Mandaliya, mrramlama, Mrs.Geethashree NavaneethaKrishnan, Nassim Bougtaia, nicbenk, Paul Mwangi, Paul Septan, Rana922, Rubina Rai, Safdar Khan, shahroshan15, Talento-Unido, ueritom, Verdia Juliansyah Cancerika, Yeoh Jung Chin, Zeina Mirella Barzaga Arencibia

# उंटाच्या साहसामध्ये आपले स्वागत आहे!

‘उंटाचे साहस’ एक नविन आणि उत्साहपूर्ण सुट्टी शाळा कार्यक्रमात आपले स्वागत आहे! इस्त्राएल लोकांसारखे बंदीवास असतांना ह्या भ्रष्ट जगामध्ये धैर्याने देवाचे अनुसरण करणे शिकत असतांना तुमच्या मुलांना उंट व राजे ह्यांच्या बरोबर जंगली साहसात घेऊन जा. ह्या कार्यक्रमात आपण दानीएल व त्याचे मित्र शद्रख मेशख आणि अबेदनगो ह्यांच्या जीवनाचे अनुसरण करणार आहोत. धडा 4 मध्ये एस्तेर राणी तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत पाहूणी म्हणून येणार आहे.

ह्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत मुलांना ख-या जीवनातील अधुनिक वळणासह मजेशीर उंट (पपेट किंवा अभिनेते) ह्यांना जाणून घेणे आवडेल. धडयाच्या शिर्षकाबरोबर जाणारी मजेशीर कृती मुलांना शिकवा आणि मुख्य धडयात व पूर्ण दिवसभर त्याची पुनरावृत्ती करा. साम्राज्यातील हस्तकृती ह्या स्थानकावर परवडणारे व सहजरित्या उपलब्ध होणारे व जगात कुठेही पर्याय मिळणारे साहित्याचा उपयोग करून मजेशीर हस्तकृती तयार करा. राजमहलात वर्ग ह्यात मुलं क्लिष्ट चक्रव्यूह आणि विविध कोडे सोडविण्याचा आनंद घेतील. मोठया मुलांना त्या धडयाशी संलग्न जीवनातील वास्तव समस्या ह्यांचा विचार करण्याची संधी मिळेल आणि प्रत्येकाला दररोज एक छोटे नेमून दिलेले काम मिळेल त्यांना धडा आचरणात आणण्याचा सराव करण्यासाठी. दानीएल व एस्तेर ह्यांना भेटणे आणि त्यांच्या कडुन थेट गोष्टी ऐकणे आणि नंतर दानीएल स्थानकावर नाटकामध्ये मनोरंज कार्य करणे मुलांना आवडेल. नक्कीच कुठलीही सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळा ही खेळांशिवाय पूर्ण होणार नाही! बागेतील खेळ आणि राजेशाही मेजवानी स्थानकावर खेळ आणि ऐच्छिक फराळाच्या कल्पना पहा. अधिक कल्पना पाहण्यास विसरू नका जेणे करून तुमची सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळेत अधिक सजावट करण्यासाठी व ती अधिक मजेशिर बनविण्यासाठी अधिक कल्पना प्राप्त होतील!

तुमची मंडळी पाच धडयांमधून कार्य करीत असतांना प्रीती आणि शौर्य ह्यातील परस्पर संबंध शोधा आणि मुलांच्या ते लक्षात आणून द्या.

1 योहान 4:18 ‘प्रेमाच्या ठायी भीति नसते इतकेच केवळ नव्हे तर पूर्ण प्रीति भीतीला घालवून देते भीतीमध्ये शासन असते आणि भीति बाळगणारा प्रीतिमध्ये पूर्ण झालेला नसतो.’

ख्रिस्ती ह्या नात्याने देवाच्या महानतेच्या समजामध्ये आणि त्याच्या आपल्यासाठी असलेल्या अपार प्रितीत वाढत असतांना आपण त्याला अनुसरण्याच्या आपल्या आत्मविश्वासामध्ये वाढू. आपणातील प्रत्येकामध्ये देवासाठी व इतरांसाठी प्रीती वाढेल अशी प्रीती जी आपल्याला दानीएल व त्याच्या मित्रांनी केलेल्या साहसी गोष्टी आणि येशू ज्याने आपल्यासाठी साहसी रित्या त्याचा जीव वधस्तंभावर अर्पण केला अशा साहसी गोष्टी करण्यासाठी प्रेरित करेल.

ह्या कार्यक्रमातील सर्वात महत्वाचा धडा हा तारणाच्या संदेशासह धडा 2 आहे. सुट्टीतील पवित्र शास्त्र शाळेत अधिक मुलांना आमंत्रित करा आणि त्यांना त्यांचे जीवन येशूला देण्याची संधी द्या. जर तुम्ही केवळ तीच एक गोष्ट केली तरी तुमची सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळा मोठया प्रमाणात यशस्वी होईल. सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळेमुळे स्वर्गात असलेल्या लोकांना भेटणे ह्याची कल्पना करा! कल्पना करा की तो त्या मुलांवर खूप प्रीती करतो त्या मुलांना तुम्ही आमंत्रित केले ह्या साठी देव तुमच्या वर किती खूष होईल!



आम्ही प्रार्थना करतो की तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रतील लोकांना शिष्य करा ही प्रभूची आज्ञा पाळत असता आणि मुलांना त्याची आज्ञा पाळण्यासाठी शिकवित असतांना देव तुमच्या सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळेवर आर्शावाद देईल.  मुलांच्या सेवेतील आपले ध्येय केवळ मोफत मुलांची काळजी घेणे नाही तर मुलांना देवाबद्दल शिकविण्यासाठी प्रत्येक संधीचा उपयोग करणे आहे. सुट्टीतील पवित्र शास्त्र शिक्षण शाळेच्या कार्यक्रमासाठी प्रार्थना करण्यास तुमच्या चमूला एकत्रित करा आणि नंतर देव तुमच्या विद्यार्थ्यांच्या जीवनात कसे कार्य करतो ते पाहा.





तुम्ही इथे जीवन बदलण्यासाठी आहात आणि आम्ही तुमची मदत करण्यासाठी.

मुले महत्वपूर्ण आहेत सेवेच्या संपूर्ण चमू तर्फे.

# दृष्टीक्षेप






## 1. शौर्य देवाला प्रथम स्थान देते

### दानीएल 1: नविन घर व शाळा

रोमकरांस पत्र 12:2 “देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.”






## 2. शौर्य देवावर भरवसा ठेवते

### दानीएल 3: अग्नीची परिक्षा

स्तोत्रसंहिता 47:2 “कारण परमेश्वर परात्पर व भयप्रद आहे; तो अखिल पृथ्वीचा महान सार्वभौम राजा आहे.”





## 3. शौर्य सत्य सांगते

### दानीएल 4: वाईट बातमीचे स्वप्न

करिंथकरांस पहिले पत्र 13:6

“ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते.”





## 4. शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते

### एस्तेर 3-9: तिच्या लोकांचे तारण

1 योहानाचे 3:16 “ख्रिस्ताने आपल्याकरता स्वतःचा प्राण अर्पण केला ह्यावरून आपल्याला देवाच्या प्रीतीची जाणीव झाली आहे; तेव्हा आपणही आपल्या बंधूकरता स्वतःचा प्राण अर्पण केला पाहिजे.”





## 5. शौर्य टिकून राहते

### दानीएल 6: दैनंदिन भक्ती आणि सिहांची गुहा

इब्री लोकांस पत्र 10:36 “तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे वागून वचनानुसार फलप्राप्ती करून घ्यावी, म्हणून तुम्हांला सहनशक्तीचे अगत्य आहे.”

# हे साहित्य कसे वापरावे

## संचालकासाठी

व्हीबीएस चा संचालक ह्या नात्याने तुमचे मुख्य कार्य व्हीबीएस चालविणे आहे. सर्व वेळापत्रक कार्यक्रम तयार करतांना आणि स्वयंसेवक व साहित्याचा समन्वय साधतांना तुम्हाला व्हीबीएसचे कार्य चालविण्यासाठी वेळ मिळणार नाही. स्वयंसेवक निवडा आणि व्हीबीएसचे वेगवेगळे भाग तुमच्या मंडळीतील सदस्यांना सोपवून द्या. ह्यामूळे कार्यक्रमासंबंधी उत्साह वाढेल आणि मुलांपर्यंत पोहचण्यासाठी तुमच्या मंडळीतील सदस्यांना सहभागी करून घेण्यासाठी मदत मिळेल.

## भरती करणे

तुमच्या मंडळीतील शक्य तितके लोक शामिल करा. व्हीबीएस मध्ये सामान्य मदत मागू नका परंतू प्रत्येक व्यक्तिशी प्रत्यक्ष बोला आणि एका विशिष्ट गोष्टीसाठी मदत मागा. कदाचीत तुमच्या मंडळीमध्ये एखादी व्यक्ति असेल जी शिकविण्यासाठी घाबरेल परंतू मुलांना हस्त कृतीसाठी मदत करण्यास आनंदी राहिल.

सूचविलेल्या भूमिका अशा आहेत (10+ लोक):

- एमसी, “सूत्रसंचालक” - व्हीबीएस डायरेक्टर असू शकतो
- उंटाच्या नाटकासाठी 2 अभिनेते/पपेट चालविणारे आणि एक उद्घोषक (कोणीही)
- मुलांना गीते शिकविण्यासाठी संगीत पुढारी
- सर्व मुलांना एकत्रित मुख्य धडा शिकविण्यासाठी शिक्षक - व्हीबीएस संचालक असू शकतो.
- विद्यार्थी पुस्तकांसाठी आणि मोठया मुलांच्या चर्चेसाठी वर्ग स्थानक शिक्षक
- दानीएला बरोबर नाटकासाठी दानीएल आणि एस्तेर होण्यास 2 अभिनेते
- दानीएला बरोबर नाटक स्थानकासाठी कृती पुढारी
- हस्तकृती पुढारी
- फराळ समन्वयक
- खेळ पुढारी

अधिक लोक असल्यास लहान मुलांसोबत मदत करण्यासाठी दृकश्राव्य यंत्रसामग्री चालविण्यासाठी संगीत शिकविण्यासाठी किंवा प्रत्येक स्थानकावर मदतनीस इ. साठी एक किंवा अधिक मदतनीस असू शकतात.

## प्रशिक्षण

जे काही ते करत आहेत ते त्यांना स्पष्ट समजले तर तुमचे स्वयंसेवक त्यांचा भाग करण्यासाठी अधिक आनंदी राहतील. आमच्या यू ट्यूब चैनलच्या व्हीडिओ सोबत प्रशिक्षण दिवस ठरवा. त्यांना व्हीबीएसची मोघम माहिती द्या तसेच त्यातील त्यांच्या भूमिके संबंधी विशिष्ट माहिती द्या.

https://www.youtube.com/c/Childrenareimportant

## आमंत्रण व नोंदणी

सुर्वाता प्रसारासाठी व्हीबीएस मोठी संधी आहे. कल्पना करा की तुम्ही कोणाला तरी भेटाल जो तुम्हाला सांगतो की तुमच्या व्हीबीएस मुळे तो येशूचे अनुसरण करत आहे! तुमचे व्हीबीएस केवळ मंडळीतील मुलांपूरते सिमीत ठेवू नका. जाहिरात साहित्य तयार करा आणि मुलांना त्यांच्या वर्गातील इतर मुलांना आमंत्रित करायला सांगा आणि जर काही मुलांचे मित्र व्हीबीएसला आले तर त्यांना बक्षीस द्या. जर तुम्ही व्हीबीएस मध्ये सहभागी होण्यासाठी लहानशी फी घेत असाल तर आईवडीलांनी त्यांच्या मुलांच्या मित्रांना शिष्यवृत्ती द्यावी म्हणून त्यांना आमंत्रित करा जेणे करून मुलांचे मित्र सुध्दा येशूला जाणतील.

तुमच्या व्हीबीएसला किती मुलं येत आहेत हयाचा अंदाज लावण्यासाठी वेळे आधी काही नोंदणी करा जेणे करून तुम्ही आवश्यक ती सामग्री गोळा करू शकाल.

## वेळापत्रक

सर्व 5 दिवसांसाठी सारखेच वेळापत्रक आहे. हे वेळापत्रक जुळवूण घेण्यासाठी मोकळी असू द्या.

सर्व मुलं एकत्रित असतांना दिवसाची सुरवात करा.

सुरवात (सर्व एकत्र):

- प्रार्थना
- गीत (ऐच्छिक)
- टाळी/ लक्ष वेधकाची ओळख करून द्या
- उंट नाटक
- धडा


आमचा सल्ला आहे की उंट नाटक आणि मुख्य धडा हयाच्या मध्ये तुम्ही काही गीते गावी जेणे करून मुलांना हालचाल करण्याी संधी मिळेल.

नंतर मुलांना परिभ्रमण स्थानकासाठी गटांमध्ये विभागा

परिभ्रमण (वयोगट)

- राजवाडयामध्ये वर्ग (विद्यार्थी पुस्तक)
- दानीएला बरोबर नाटक
    - नाटक – दानीएल
    - कार्यानूभव
- साम्राज्यात हस्तकृति

नंतर सर्व मुले शेवटच्या कृति मध्ये एकत्र भाग घेऊ शकतात .



सर्व एकत्र, मोठा गट:

- फराळ
- गीते (ऐच्छीक)
- खेळ

पटकन धड्याची उजळणी आणि प्रार्थना करून दिवसाचा शेवट करा .

## उंट नाटके



ह्या व्हीबीएस मध्ये दररोज 2 नाटकं राहणार आहेत! प्रथम दोन उंटांसोबत पपेट शो राहिल सर्व मुलांबरोबर एकत्र दिवसाच्या सुरवातीला. दुसरं एक मुलाखत आहे ज्यात एक अभिनेता दिवसात नंतर एका स्थानकावर दानीएलाची भूमिका निभावतो. दानीएल नाटका बद्दल अधिक माहिती स्थानक स्थलांतर ह्यात वाचा.

दररोज पपेट शो मध्ये दोन उंट मित्रांना जाणून घेणे तुमच्या मुलांना आवडेल! हे मूळ नाटकं प्रत्यक धडयाचा मुख्य मुद्दा समजावून सांगण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. तुम्हाला दोन उंट पपेट लागतील (किंवा अभिनेते) आणि मंचाच्या मागे एका उद्घोषकाचा आवाज.

- कॅमेलॉटः एक बावळट मुलगा उंट ज्याला चिडविणे आवडते, ज्याची दुर्गंधी येते आणि जो नेहमी भूकेला असतो.
- कॅमेलीयाः मुलगी उंट जी थोडी भित्री आहे परंतू जी देवावर प्रेम करते, आणि मुलींच्या गोष्टी व गाणे तिला आवडते.
- उद्घोषक

पात्रांची नावे बदलण्यासाठी मोकळीक घ्या, विनोद टाका किंवा तुमच्या गरजेनुसार हे नाटकं जुळवून घ्या. कृपाकरून हे लक्षात घ्या की मुलांचा लक्ष देण्याचा काळ 8 मिनिटाचा असतो (दर वर्षानुसार अंदाजे 1 मिनिट) त्यावेळेच्या आत नाटक संपवा, आणि ते पूर्ण आठवडाभर ह्या नाटकांची वाट पाहतील. आणि मजा करण्यास विसरू नका!

ह्या व्हीबीएसच्या संकेतस्थळावर असलेला आमचा सोपा नमूना वापरून तुमचे स्वतःचे उंट पपेट तयार करा. आणि हे पपेट कसे वापरायचे ह्या बद्दल संक्षिप्त कृती ह्या व्हीडीओत पाहाः https://youtu.be/G7NWA7VUZAI

## लक्ष वेधक

तुमच्या श्रोत्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी दर रोज आम्ही एक कृती दिली आहे. प्रत्येक वेळेस जेव्हा तुम्ही धडयाचे शिर्षक बोलाल, उदा, “शौर्य देवाला प्रथम स्थान देते!” तेव्हा विद्यार्थी कृती करत त्या वाक्यांशाची पुनरावृत्ती करतील. दिवसाच्या सुरवातीला विद्यार्थ्यांना लक्ष वेधक शिकवा, आणि दिवसभरात त्याची अनेकदा पुनरावृत्ती करा, आधल्या दिवसाच्या कृतीची उजळणी करा. कृतीच्या स्पष्ट प्रात्यक्षिकासाठी यू टयूब वर आमचे चलचित्र पाहा.

# परिभ्रमण स्थानकं

‘‘परिभ्रमण स्थानक’’ तुमच्या व्हाबीएसला सुनियोजीत करण्याचा मार्ग आहे जेणे करून सर्व मुलांना एकाच वेळेस हस्तकृती करण्यासाठी तुम्हाला भरपूर डिंक, पेन्सील इ. लागणार नाही. मुलांना 3 किंवा अधिक गटात विभागा आणि त्यांना कृती आळीपाळीने करू द्या. उदा. प्रगट आणि कठिण वर्ग मध्यम वर्ग विद्यार्थी पुस्तकावर काम करत असतांना हस्तकृती तयार करू शकतात आणि सोपा वर्ग ‘‘दानीएलाबरोबर नाटक’’ स्थानकावर कार्य करेल. प्रत्येक स्थानक हे 20 मिनिटासाठी तयार करण्यात आले आहे. संचालक किंवा कोणीतरी हे घडयाळ पाहिल आणि स्थानकांवर लक्ष ठेवेल आणि जेव्हा अदलाबदली करण्याची वेळ येईल तेव्हा घोषणा करेल.

जर जागा परवांगी देत असेल तर तेच कार्य त्या जागेवर राहू द्या आणि मुलांना दर 20 मिनिटांनी हालायला सांगा. ह्यामूळे मुलांना उभे राहून हालण्यासाठी काही वेळ मिळेल. जर पूरेशी जागा नसेल तर, मुलांना एकाच जागेवर ठेवा आणि ते करत असलेली कृती बदला. त्यांना उठण्याची आणि ताणण्याची परवांगी द्या किंवा कृतीच्या मध्ये जागा बदलू द्या जेणे करून हालण्याची संधी मिळेल.

उदाहरणः

**पहिले 20 मिनिट**




**दुसरे 20 मिनिट**




जर तुमच्याकडे पूरेशी जागा आहे तर, 4 वेगवेगळे वयोगट विभागण्यासाठी खेळ, हे आणखी एक स्थानक म्हणून वापरा, परिभ्रमण स्थानकामधील वेळेत कधीतरी फराळ द्या.

एकदा तुम्ही वेळापत्रक आणि विविध कृतीच्या स्थानकाची जागा ठरविली की, दररोज तेच वेळापत्रक ठेवा. मुलं पटकन शिकतील आणि त्यांना कळेल की नंतर कुठे जायचे आहे, बरेचदा शिक्षकांच्या अधीच. 😉

राजवाडयामधील वर्गासाठी टेबल किंवा बाक असलेली जागा स्थानकाच्या ऐवजी वापरा.

## राजवाडयामध्ये वर्ग

**कोडे**




ह्या स्थानकावर, मुलं त्यांच्या विद्यार्थी पुस्तकातील कोडे सोडवितांना मजा करतील. आपले पुस्तकं ह्या वयोगटासाठी तयार करण्यात आले आहेतः

सोपे – 4-6 वर्ष

मध्यम – 7-9 वर्ष

कठीण – 10-12 वर्ष

प्रगत – 13+ वर्ष

**गृहपाठ**

उंट साहस व्हीबीएस मध्ये प्रत्येक धडयात लहानसा नेमून दिलेले काम आहे ह्यासाठी की त्या दिवशी धडा आचारणात आणावा. मुलांनी कालची नेमून दिलेले काम कृती केली की नाही ते विचारा आणि नंतर आजची कृती पूर्ण करण्याच्या विशिष्ट मार्गांची चर्चा करा.

याकोब 1:22 ‘‘वचनाप्रमाणे आचरण करणारे असा केवळ ऐकणारे असू नका, अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करिता.’’

**चर्चा प्रश्न**

मुलं जसजसे मोठे होतात, तसे ते जीवनाची क्लीष्टता पाहू लागतात आणि ते पवित्र शास्त्रातील गोष्टी मधून जे शिकतात त्याचे लागूकरण त्यांच्या स्वतःच्या जीवनात करण्यासाठी संघर्ष करू शकतात. ह्या कारणाने आम्ही प्रश्न व उत्तर विभाग मोठया विद्यार्थांसाठी पूरविला आहे ह्यासाठी की त्यांना त्यातील काही प्रश्नांमध्ये मदत करावी आणि धडा त्यांच्यासाठी वास्तव करावा. त्यांना लगेच उदाहरण उत्तरं देऊ नका, परंतू विद्यार्थ्यांना स्वतः विचार करू द्या, व ते जे शिकले ते त्यांना अधिक चांगल्या रित्या लक्षात ठेवण्याची परवांगी द्या. शक्य असेल तर, उत्तर देऊच नका परंतू त्यांच्या चर्चेचे असे मार्गदर्शन करा की ते स्वतः त्यासारख्या निष्कर्षापर्यंत पाहेचतील. पवित्र शास्त्रातील केवळ ऐतिहासिक सत्यच नव्हे तर आजच्या जीवनासाठी लागूकरणाचा विचार करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करा. तुमच्या वर्गात विश्वासाचे वातावरण तयार करा जेणे करून तुमचे विद्यार्थी त्यांना काय वाटते हे चूकण्याच्या भिती शिवाय सांगण्यासाठी सुरक्षितता अनुभवतील. जर ते वयैक्तिक रित्या आणि प्रामाणीकपणे ह्या प्रश्नांना प्रतिक्रिया देतील तर ते वाढतील आणि अधिक परिपक्व होतील.

## दानीएलाबरोबर नाटक




इतर स्थानकाप्रमाणे ह्या स्थानकावर करण्यासाठी 2 कृती आहेत. प्रथम दानीएलाबरोबर नाटक आणि नंतर धडयाची मजबुती करण्यासाठी एक कृती.

पवित्र शास्त्रामधील दानीएल आणि एस्तेर ह्या आपल्या मित्रांना भेटणे मुलांना मजेशीर वाटेल. स्वयंसेवकांना भूमिका करण्यास तयार करण्यासाठी मजेशीर मार्ग शोधा.

बाबेल, मेदय आणि पारसी राज्यावर मोठया हुद्दयावर असेला दानीएल. एस्तेर पारसी राज्याची सुंदर राणी आहे.

नाटकासाठी आम्ही काही कथानक दिले आहेत. गरजेनुसार नाटक बदलण्याची मुभा घ्या किंवा शिक्षकासोबत मुलांखतीत त्याचे रूपांतर करा. जर तुमच्या कडे भरपूर लोक असतील तर, तुम्ही शद्रख, मेशख आणि अबेदनगो किंवा राजा नबुखदनेस्सर ह्याला भेट देण्यासाठी आमंत्रित करू शकता.



स्थानकावरील नाटकानंतरच्या भागा नंतर, मुलांबरोबर कृती करा. जे काही ते शिकले ते आचारणात आणण्यासाठी मदत करण्यासाठी ही कृती एक मजेशीर साधन आहे. ह्या कृतीची चांगली गोष्ट ही आहे की ती केवळ मजेशीरच नाही तर मुलांना विचार करण्यासाठी आणि वेगवेगळया परिस्थितीमध्ये ते काय करतील ह्यावर मनन करण्यासाठी ही संधी आहे.

## साम्राज्यात हस्तकृती

सम्राज्यात हस्तकृती स्थानकावर तुम्हाला मजा येईल, साध्या हस्तकलेद्वारे सर्जनशीलतेचा सराव करण्याची ही वेळ आहे. प्रत्येक हस्तकृती लहान आणि मोठया विद्यार्थ्यासाठी सारखीच तयार केलेली आहे, ते एकत्र तयार करणे आणि त्याला वयैक्तिक स्पर्श देणे सर्वांना आवडेल.






## बागेतील खेळ

खेळांशिवाय व्हीबीएस पूर्ण होणार नाही! ह्या स्थानकावर भरपूर उर्जा असलेले उत्तम खेळ तुम्हाला आढळतील. मुले त्याचा आनंद घेतील आणि ते खेळणे तुमच्यासाठी सोपे राहिल. खेळासाठी साधे, परवडणारे साहित्या लागेल जे मिळणे सोपे आहे. ह्या मजेदार व्हीबीएस मध्ये ह्या अनुभवांचा आनंद घ्या.

## शाही मेजवानी

ह्या स्थानकामध्ये तुम्ही प्रत्येक धडयाशी समन्वय साधाणारे आरोग्यपूर्ण, चविष्ट आणि मजेदार फरळ देऊ शकता. तयार करण्यासाठी सोपे आणि परवडणारे होण्यासाठी तुम्ही कोणतेही पदार्थ बदलू शकता. ते केवळ खाण्यासाठीच मजेदार नाहीत तर मुलांना ते तयार करू दया ह्या साठी की धडयाची पुष्टी होण्यासाठी आणखी एक मजेदार कृती होईल.



# अधिक कल्पना

### विटांचा देखावा

सजावटीसाठी आणि राजवाडयाच्या भिंतीची प्रेरणा देण्यासाठी विटांच्या भिंती.






### पुठ्ठयाचा उंट

मुलांचे बसण्याचे बाक किंवा कार्य टेबल सजविण्यासाठी तुम्ही अनेक लहान उंट तयार करू शकता.

### कृती चक्र

एक गोल चक्र तयार करा जेथे तुम्ही मुलांनी ज्या कृती अंमलात आणल्या पाहीजे त्या लिहू शकता आणि ते खोलीत कुठेही ठेवा, ते त्यांच्यासाठी एक क्रियाशील सजावट होईल!!




### राजवाडयात मेजवानी

तुम्ही मुलांना मुकुट घालू शकता आणि टेबल क्लॉथनी टेबल सजवू शकता. चविष्ट फराळाचा आनंद घेत असतांना मुलांना वाटेल की ते राजवाडयात जेवत आहेत








### भट्टी

खोलीच्या सजावटीचा भाग म्हणून धडा 2 साठी पुठ्ठयाच्या खोक्या पासून एक भट्टी तयार करा. ती मुलांसाठी एक मजेदार गोष्टीही असेल.




### फोटोची चौकट

फोटो काढण्यासाठी एक जागा तयार करा जेणेकरून मुलं सेल्फी काढू शकतील.



## सिंहांची गुहा

एका पुठ्ठ्याच्या खोक्याला राखडी किंवा कत्था कागद लावून गुहेच्या भिंतीचा भास तयार करा. मागच्या बाजूला सिंहाचे काही चित्र आणि दानीएल दाखविण्यासाठी चित्र चिटकवा, आणि तुमच्या कडे धडा 5 साठी सिंहाची गुहा तयार होईल. ते तुमच्या वर्गाच्या सजावटीचा भाग होईल आणि तुम्ही ते काही कृतीसाठी वापरू शकता.





## कागदाची आग

जमीनीवर गोल सतरंजी किंवा ब्लॅकेट ठेवा, त्यावर उश्या ठेवा आणि मधे कागदाची आग ठेवा. ह्या जागेचा उपयोग ह्या अद्‌भूत व्हीबीएस ‘उंटाचे साहस’ ह्यातील पात्रांच्या जीवनाबद्दल मुलांना सांगण्यासाठी  करा. उश्या ठेवा आणि मधे कागदाची आग ठेवा. ह्या जागेचा उपयोग ह्या अद्‌भूत व्हीबीएस ‘उंटाचे साहस’ ह्यातील पात्रांच्या जीवनाबद्दल मुलांना सांगण्यासाठी करा.



## कागदाचा बगीचा

वर्गाच्या सजावटीसाठी आणि वातावरण तयार करण्यासाठी बाबेलचे लटकणारे बगीचे प्रेरणादायक ठरू शकतात. त्यामूळे मुलांना बाबेलमध्ये असल्यासारखे वाटेल!



## राजाचे सिंहासन

एका खुर्चीला राजाचे सिंहासन असल्या सारखे सजवा.



## क्यूनिफोर्म सजावट

तुमच्या विद्यार्थ्यांसोबत क्यूनिफोर्म हस्तकृती तयार करा आणि मूळ साजावट म्हणून ते संपूर्ण खोलीत लावा.



# 1. शौर्य देवाला प्रथम स्थान देते
## दानीएल 1: नविन घर आणि शाळा

### लक्ष वेधक / अध्याय 1

"शौर्य देवाला प्रथम स्थान देते"

1. "शौर्य": मुठी आवळून आपले हात पूर्ण शक्तीने वर करा
2. "देवाला": दोनदा टाळी वाजवा
3. "प्रथम": आकाशाकडे हात दाखवा

### पाठांतर वचन 1

रोमकरांस पत्र 12:2 "देवा ची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या."

### नाटक 1: उंट शर्यत

कॅमेलीया मंचावर प्रवेश करते: बापरे त्या सर्व उंटाकडे पाहा बरं ! नविन शर्यत पाहायला मिळत आहे म्हणून मला आनंद वाटतो . इइइइ तो वास कशाचा आहे?

कॅमेलॉट मंचावर प्रवेश करतो: माफ करा. आज मी अत्तर लावण्यास विसरलो. मी ताकदवान आहे. महोदया, आपले नाव काय आहे?

कॅमेलीया: मी कॅमेलीया. आणि आपले नाव, महोदय?

कॅमेलॉट: कॅमेलॉट, शर्यतीस तयार! मी पूर्ण वर्षभर सराव करीत आहे: धावत आहे, धावत आहे आणि धावत आहे आणि धावत आहे. (दम टाकतो) आणि अडखळतो आणि धावतो आणि कदाचित पुढच्या आठवडी थोडेसे पाणी पिईल आणि धावत असतांना गुळण्या करील आणि धावत राहील आणि धावण्याचे स्वप्न पाहिल, धावत राहील.

कॅमलिया: बापरे, ते फारच जास्त धावणे झाले ! तुझ्या पाठीवर काय आहे?

कॅमेलॉट: माझा सोबती रोबोट आणि मी 7 नंबर आहोत, पाहाता ना? परंतु मला हे समजत नाही की माझा रोबोट माझ्या मालकासारखा का वाटतो. अरे, मी पाहात आहे की काही मोठे उंट शक्तीशाली होण्यासाठी गोळी घेण्याबाबत बोलत आहेत. मला वाटते त्या गोळीला स्रेडॉईड म्हणतात? ब्लेफोइड? झफालापौंइड? (कॅमेलॉट स्टरॉईडचा उच्चार चूक करतो). थोडेसे फसविल्याने कोणाचे नुकसान होत नाही, होते का? पकडले जाणार नाही....मी खूपच वेगवान आहे.

कॅमेलीया: परंतु ते इतरांसाठी अन्यायकारक आहे. तुम्ही केवळ उत्तम प्रयत्न करा आणि त्याची आज्ञा पाळून आणि इतराप्रती योग्य राहून देवाला प्रथम स्थान द्या. याशिवाय, तुम्ही जिंकता किंवा जिंकत नाही, देव तुमच्यासोबत असेल. तो सर्वांपेक्षा मोठा विजय आहे, नाही का?

कॅमेलॉट: (उसासा टाकतो). तू बरोबर आहेस. मी शर्यत सुरू करण्याच्या जागेवर आलो आहे. (मंचावरून जातो, अडखळतो आणि पडतो), मी ठीक आहे!

कॅमेलीया: आशा धरते की तो चांगला धावेल. (कॅमेलीया मंचावरून आपल्या मित्राला हुरूप देते).

उद्घोषक: आणि त्यांनी धावायला सुरूवात केली आहे! सुरूवातीला 3 क्रमांकाने पुढावा घेतला आहे, त्याच्या मागे नंबर 1 आहे. आणि पाहा नंबर 27 समोर येत आहे! नंबर 3 आपली जागा राखण्यास झगडत आहे. आता केवळ 100 मीटर अंतर शिल्लक आहे. नंबर 27 ने नंबर 1 ला मागे टाकले आहे. आणि विजेता आहे नंबर 3! नंबर 27 आणि नंबर 1 त्याच्या अगदी जवळ आहेत.!

कॅमेलॉट धापा टाकत प्रवेश करतो.

कॅमेलीया: तुम्ही सर्वजण धाव चाकोरीमध्ये वेगाने धावत होता! ते पाहायला खूप मजा आली. शर्यत कशी झाली?

कॅमेलॉट: मी विजयाच्या जवळपास सुध्दा नव्हतो. मला 4था नंबर मिळाला.

उद्घोषक: थांबा! या ठिकाणी खूप अव्यवस्था माजलेली आहे, असे सांगण्यात येत आहे की काही उंटांनी कामगिरी उत्तेजक औषध घेतले आहे. नंबर 3, 27, आणि 1 अपात्र ठरविण्यात आले आहेत! त्यामुळे नंबर 7 हा अधिकृत विजेता ठरला आहे.

कॅमेलीया: कॅमेलॉट, तू जिंकला आहेस!

कॅमेलॉट: वॉव!! देवाची स्तुती असो! तुझ्या मदतीसाठी आभार मानतो, कॅमेलीया. मी माझी सचोटी जवळ जवळ गमावली होती, परंतु आता मला हे कळून चांगले वाटत आहे की मी देवाला सन्मान मिळेल अशा प्रकारे धावलो आहे. बापरे, मला खूप तहान लागली आहे! (आपले तोंड मंचाच्या मागे करून पाण्याचा लहानसा घोट घेतो). हा.... या आठवडयासाठी एवढे पाणी पुरेसे आहे. आता मला भूक लागली आहे.

## मुख्य धडा 1

या व्ही बी एस मध्ये तुमचे स्वागत आहे, जेथे आपण देवासाठी शूर असण्याबाबत शिकणार आहोत! मोठा पल्ला गाठावयाचा आहे. खुप काळाआधी, इस्त्राएल लोकांना बंदीवान म्हणून नेण्यात आले होते आणि नबूखद्नेसर राजा त्यांना बाबेल देशी घेऊन गेला. किती भयानक! देवाचे लोक परक्या देशामध्ये अशा लोकांमध्ये राहात होते ज्यांना देवाची ओळख नव्हती. अशाच प्रकारे आपण अशा जगामध्ये राहात आहोत जेथे लोकांना देवाची ओळख नाही किंवा ते त्याला अनुसरण्याचा प्रयत्न सुध्दा करीत नाहीत. परंतु देव बाबेलमध्ये इस्त्राएली लोकांसोबत होता आणि त्याने विस्मयकारक गोष्टी केल्या; अशाचप्रकारे, या भ्रष्टाचारी जगामध्ये तो आपल्या सोबत आहे. सर्वजण म्हणा, "शौर्य देवाला प्रथम स्थान देते !".

तुम्हाला शाळेमध्ये कोणी नाव ठेवून चिडवले आहे का, किंवा कोणाला नावं ठेवण्यात आलेले तुम्ही पाहिले आहे का? तुमच्या शिक्षकांनी तुम्हाला आपल्या देवाविरूध्द काही चुकीचे शिकविले आहे का? अशीच गोष्ट बाबेलमध्ये घडली. नबूखद्नेसर राजाने इस्त्राएलातील उत्तम तरूण मुले घेतली आणि त्यांना बाबेल विश्वविद्यालयामध्ये प्रवेश दिला, यासाठी की त्यांना राजाची सेवा कशी करावी हे शिकावे. त्यामध्ये दानीएल, शद्रक, मेशक आणि अबेद्नगो हे होते. सर्वजण म्हणा, 'शौर्य देवाला प्रथम स्थान देते !".

राजाने त्यांची नावे बदलली, देवाच्या नियमाहून भिन्न अशा गोष्टी त्यांना शिकविल्या, आणि त्यांना वेगळे अन्न दिले. या तरूणांनी त्यांची बदललेली नावे स्विकारली आणि धीराने त्यांना दिलेल्या आज्ञा पाळल्या, परंतु अन्नाबाबत ते खंबीर राहिले, कारण त्यामुळे सरळ सरळ देवाच्या आज्ञेचा भंग होत होता. अशाचप्रकारे, जग प्रयत्न करते की आपण लबाडी करावी, फसवावे, चोरी करावी आणि दुस-या लोकांना नीचपणे वागवावे, किंवा देव सोडून बाकीच्या गोष्टींची भक्ती करावी. देवाने

आपल्याला सांगितले आहे की यापैकी कोणतीहि गोष्ट आपण करू नये आणि जरी जग आपल्यावर दबाव टाकते तरी सुध्दा आपण देवाची आज्ञा पाळावी. सर्वजण म्हणा, ‘शौर्य देवाला प्रथम स्थान देते !’’.

दानीएल, आपल्या मार्गामध्ये बुध्दीमान होता. त्याने जेवण कारभा-याला म्हटले की दहा दिवस त्याने शाकान्न खावू द्यावे. स्थिर राहून देवाची आज्ञा पाळणबाबत तुम्ही देवाला मागू शकता. सर्वजण म्हणा, ‘शौर्य देवाला प्रथम स्थान देते !’’

महाविद्यालया नंतर हे तरूण राजाच्या सेवेमध्ये रूजू झाले, शासन आणि प्रशासनामध्ये काम करू लागले. त्यांनी एवढे चांगले काम केले की त्यांना वरच्या जागेवर पदोन्नती मिळाली, जेथे सर्व लोकांसाठी गोष्टी चांगल्या करण्याची त्यांना संधी मिळाली. येशू म्हणतो, जे आपण त्याच्यावर विश्वास ठेवतो ते जगाचा प्रकाश आहोत. देव तुम्हाला अशा जागी ठेवणार आहे जेथे तुम्ही चांगल्याप्रकारे जगाला प्रकाश देवू शकाल, तुम्ही राजकारण, व्यापार, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधी, घरी राहून लेकरांची देखभाल, खेळ, पाळकीय सेवा, सेवाकार्य, शिकविणे किंवा प्रशासनामध्ये असाल. आताहि जेव्हा तुम्ही शाळा, घरी आणि तुमच्या शेजा-यामध्ये आहा, देव इतरांसाठी तुमचा उपयोग करण्यास सुरूवात करू शकतो. तुम्ही काहीहि करा, देवाला आद्यस्थान द्या, काहीहि झाले तरी. सर्वजण म्हणा, ‘शौर्य देवाला प्रथम स्थान देते !’’

# परिभ्रमण स्थानकं

## साम्राज्यात हस्तकृती 1

*हृदय*

### *साहित्य*






* पिरगळलेली रिबन, 50 सेंमी
* कागदी हृदय
* तक्ता आणि पवित्र शास्त्र वचन
* डिंक
* रंग


### *सूचना*


* हृदय आणि झेंडा कापा. तुमच्या आवडत्या रंगाने त्यामध्ये रंग भरा.
* वेढा तयार करण्यासाठी रिबनचे दोन्ही टोक हृदयाच्या मागे चिटकवा. झेंडयाला रिबनच्या मध्यभागी चिटकवा.

## राजवाडयामध्ये वर्ग 1

















## प्रश्न आणि उत्तरे 1

1. **कोणत्या चुकीच्या गोष्टी "ठीक आहेत" असे वाटते, कारण "सर्वजण तसे करतात"?**
   उदाहरणार्थ, चॉकलेट चोरणे, कचरा कुठेहि फेकणे, शिक्षा चुकविण्यासाठी लबाडी करणे, तुम्ही पूर्ण करू शकणार नाही अशी वचने देणे.
2. **दरबारच्या प्रमुख अधिका-याने या तरूणांची निवड का केली होती? देवाने त्यांच्यामध्ये काय वेगळे पाहिले जे लोकांनी पाहिले त्याहून भिन्न होते?**

सर्व इस्त्राएल कुळामध्ये ते उत्तम आणि सुरूप होते. दानीएल 1:3-4. ते विश्वासू आहेत असे देवाला दिसून आले. देवानेच त्यांना या योग्यता दिल्या होत्या. दानीएल 1:17.

3. **देवाने तुम्हाला काय दिले आहे?**

   उदाहरणार्थ: गलती 5:22-23. आत्म्याची फळे, प्रतिभा, क्षमता, वारसा.

4. **"देवाला प्रथम स्थान देणे" हे कसे दिसते?**

   उदाहरणार्थ:कबूली आणि भरपाई, इतरांसोबत समेट, मित्रांची नाही तर देवाची आज्ञा पाळणे.

5. **गोष्टीमधील लोक कोण होते?**

   उत्तर: नबूखद्नेसर राजा, दानीएल, हनन्या, मिशाएल, अज-या (किंवा बेलशस्सर, शद्रक, मेशक आणि अबेद्नगो).

## नेमून दिलेले काम 1

अशा गोष्टींचा विचार करा ज्यामध्ये देवाची आज्ञा पाळणे तुम्हाला कठीण वाटते. मदतीसाठी देवाला विनंती करा आणि मग पूर्ण दिवस त्याची आज्ञा पाळा.

## दानीएला बरोबर नाटक 1

शिक्षक: किती उत्साहवर्धक गोष्ट आहे की दानीएलाने आपल्या व्यस्ततेतून, राजवाडयातील उच्च पदस्थ अधिकारी म्हणून वेळ काढला आणि आपल्या जीवनाबाबत सांगण्यासाठी तो आला आहे. सर्वजण दानीएलाचे स्वागत करा.

दानीएल: हलो, सर्वजण. मी दानीएल आहे, आणि तुम्हा सर्वांना भेटून आनंद वाटतो. मला खूप आनंद झाला जेव्हा माझ्या मदतनीसाने मला सांगितले की वर्गामध्ये पुष्कळ विद्यार्थ्यांसमोर माझी मुलाखत घेण्यात येणार आहे. तुमच्यामध्ये खूप सारे सुप्त गूण आहेत! तुमच्यासाठी देवाने किती चांगल्या गोष्टी राखून ठेवल्या आहेत हे तुम्हाला माहित नाही. मजसाठी देवाच्या कोणत्या योजना होत्या हे मलाहि माहित नव्हते. आपण पाहू (जेव्हा मी तरूण होतो, आणि माझे मित्र इस्त्राएलमध्ये राहात होते. आम्ही देवाचे लोक होतो, परंतु पुष्कळ इस्त्राएली खोटया देवांची भक्ती करीत होते, जे ऐकू शकत नाही, किंवा बोलू शकत नाहीत किंवा काहीच करू शकत नाही. मी कुलीन कुटूंबामधील होतो, आणि आम्ही राजा नबूखदनेसराबाबत सर्व बातमी ऐकली, जो आमच्या पुर्वकडील राष्ट्रे पादाक्रांत करीत होता. समाजातील पुढारी म्हणत होते, "आम्ही पादाक्रांत केले जाणार नाही." ते खोटया संदेष्टयांचे ऐकत होते जे दावा करीत होते की तुम्ही काहीहि केले तरी देव तुमचे रक्षण करील आणि तुम्ही त्याची आज्ञा मोडू शकता आणि तुम्हाला जसे वाटते तसे वागू शकता. यिर्मया आणि इतर काही जण म्हणत होते की तुम्हाला नबुखद्नेसर पकडून बंदिवासात नेईल. मला असे वाटले की आपण मरू किंवा गुलाम होऊ. तर मला आणि माझ्या काही मित्रांना त्यांनी बाबेल विश्वविद्यालयात नेले तेव्हा मला किती आश्चर्य वाटले याची तुम्ही कल्पना करू शकता! आम्हाला 3 वर्षाचा पदवी अभ्यास करावयाचा होता आणि मग राजाकडे काम करावयाचे होते. आम्ही ठरविले की ज्या परिस्थितीमध्ये देवाने आम्हाला ठेवले आहे त्या परिस्थितीमध्ये जास्तीत जास्त चांगले करावे. कधीकधी ते कठीण होते, जसे की, जेव्हा त्यांनी देवाला सन्मान देणारी आमची नावे बदलून खोटया देवाला सन्मान देणारी नावे आम्हाला दिली, जसे की माझे नविन नाव बेलशस्सर होते. मला तर सुरूवातीला ते नाव उच्चारता सुध्दा येत नव्हते. आणि त्या शाळेमध्ये खूप सारे विलक्षण धर्म होते. परंतु जेव्हा त्यांनी आम्हाला असे अन्न खावयास लावले जे

आम्ही खाऊ नये, तेव्हा आम्ही ठरविले की हे सिमा ओलांडण्यासारखे आहे. आम्ही ठरविले की आम्ही कुठेहि असलो तरी देवाला प्रथम जागा दिली पाहिजे आणि जरी आम्ही एकटे पडलो तरी देवाची आज्ञा पाळली पाहिजे. आमची काळजी घेणारा मनुष्य आमचा आहार बदलण्यास खूप भित होता. मी त्याला विनंती केली की काही दिवस तसा प्रयोग करून पाहा, आणि ते साध्य झाले! देव आमच्यासोबत होता आणि त्याने आमची मदत केली. इतर तरूणांपेक्षा आम्ही निकोप होतो आणि शाळेमध्ये चांगले गूण मिळविण्यासाठी देवाने आमची मदत केली. पदवी संपादन केल्यावर, राजाने कामासाठी आमची मुलाखत घेतली. मला असे वाटले ते असे दिवस होते जेव्हा माझ्या परिवाराने सर्व थाटमाट आणि शिष्टाचारासह इस्त्राएलाच्या राजाची भेट घेतली, परंतु बाबेलमध्ये शिष्टाचार वेगळे होते. काहीहि असो, राजाने आम्हाला त्याच्या सेवेमध्ये रूजू केले आणि तेव्हापासून आम्ही साम्राज्यात सेवा करीत आहोत.

शिक्षक: या सर्व परिस्थितीमधून जात असतांना, तुला कधी असे वाटले का की तू राज्यामध्ये उच्चपदस्थ अधिकारी होशील?


दानीएल: नाही, नाही कधीच नाही. कोणीतरी मोठे होण्याचा प्रयत्न करू नका, तर देवाला प्रथम स्थान देण्याकडे लक्ष द्या आणि तुमचे काम उत्कृष्टपणे आणि सचोटीने करण्याकडे लक्ष द्या. हे लोकांच्या लक्षात येईल आणि देवाच्या सुध्दा लक्षात येईल.

शिक्षक: तू येथे आला म्हणून धन्यवाद, दानीएल! मला माहित आहे की साम्राज्यात तुझा व्यस्त असा दिनक्रम आहे. आम्ही तुला उद्या पुन्हा भेटू.

## कार्यानूभव 1


***अग्रक्रम***

प्रत्येक लेकराला मनोरा चित्र काढण्यासाठी एक कागद द्या आणि त्यावर त्यांच्या जीवनातील प्राधान्य क्रमाच्या 5 गोष्टी लिहीण्यास सांगा. पहिली गोष्ट लिहीण्याआधी, त्यांना उत्तेजन द्या की देव सर्वोच्च प्राधान्य आहे असे त्यांनी लिहावे. पवित्र शास्त्र देवाबाबत काय म्हणते याबाबत त्यांना आठवण करून द्या. (तो आपला तारक, मार्गदर्शक, बळ आहे. तो चांगला आहे आणि आपण जसे आहोत तसे तो आपल्यावर प्रेम करतो, इत्यादी). त्यानंतर लेकरे बाकीच्या गोष्टी लिहीतील. बाकीच्या प्राधान्य गोष्टी ते इतर लेकरांना सांगतील.



## शाही मेजवानी 1

### ***सँडविच मुगूट***



***घटक:***

- ब्रेड
- कागद
- सुरी
- तुमच्या निवडीप्रमाणे टाकण्याचे पदार्थ (हॅम, भाजीपाला किंवा जॅम).

*सूचना :*

1. कागदाचा मुगूट तयार करा.
2. ब्रेडच्या दोन तुकडयांचे सँडविच करा ज्यामध्ये तुमच्या आवडीचे पदार्थ टाकलेले आहेत.
3. कागदाचा मुगूट सँडविचवर ठेवा आणि सँडविच कापा.

***तयार! आता आपण आपल्या पहिल्या शाही मेजवाणीचा आनंद घेणार आहोत!***

## बागेतील खेळ 1

### ***जगाचा प्रकाश असणे***



वर्गाची दोन चमूमध्ये विभागणी करा. एखाद्या अशा घट्ट वस्तुखाली दिवा ठेवा ज्यामधून प्रकाश बाहेर पडणार नाही (आग लागणारी नाही याची काळजी घ्या). नंतर खोलीतील मुख्य दिवे विझवा आणि चमूतील प्रत्येक लेकराला खोलीमध्ये दिवा शोधण्यास सांगा. दुस-या लेकरांना संधी मिळावी म्हणून खेळ पुन्हा खेळण्यास सांगा. स्पष्ट करा की येशू ख्रिस्ताने आपणास सांगितले आहे की आपण जगाचा प्रकाश आहोत, आपण तो प्रकाश लपवू नये तर सर्व परिस्थितीमध्ये देवाची आज्ञा पाळावी. आपण देवासाठी शुर असले पाहिजे.

***उंट म्हणतो...***



शिक्षक आणि बालक पाळीपाळीने 'उंट'' होतात. ती व्यक्ती प्रत्येकला कृति करण्यासाठी सांगते, जसे की, वळणे, एका पायावर उडी मारणे किंवा उंटाप्रमाणे वाढणे. जेव्हा तो कृति करण्याआधी म्हणेल, ''उंट म्हणतो'' तेव्हा सर्व लेकरांनी तशी कृति करावी, नाहीतर ते खेळातून बाद होतील. जर त्याने ''उंट म्हणतो'' अशी सुरूवात केली नाही तर बाकीच्या सर्व लेकरांनी कृति करू नये, आणि जो कोणी कृति करील तो खेळातून बाहेर जाईल. उंट होण्यासाठी पुष्कळ लेकरांना संधी द्या. खेळ जास्त गंमतीदार व्हावा म्हणून लवकर लवकर सूचना द्या.

# २. शौर्य देवावर भरवसा ठेवते
## दानीएल 3: अग्नीची परिक्षा

### लक्ष वेधक / टाळया 2

"शौर्य देवावर भरवसा  ठेवते"

1. "शौर्य" = मुठ्ठी बनवा आणि मुठ्ठींना एकमेकांवर आपटण्याला जोडीदार करा.
2. "वर विश्वास" = पुन्हा मुठ्ठी एकमेकांना मारा आणि मग ढोपर भिडवा
3. "देव" = दोन्ही बाजू आकाशाकडे करा आणि एका बाजूला झूका

### पाठांतर वचन 2

स्तोत्रसंहिता 47:2 "कारण परमेश्वर परात्पर व भयप्रद आहे; तो अखिल पृथ्वीचा महान सार्वभौम राजा आहे."

### नाटक 2: लढाईमधील उंट

कॅमेलॉट: (मंचावर इकडे तिकडे कदम ताल करीत) हट! 2, 3, 4 हट 2,3,4 ...

कॅमेलीया: तू काय करीत आहेस?

कॅमेलॉट: मी आगेकूच करीत आहे. या आधी तू आगेकूच पाहिली नाहीस का?

कॅमेलीया: जशी तू आगेकूच करीत आहेस तशी मी पूर्वी पाहिली नाही.

कॅमेलॉट: पाहा, आज ते सैन्यामध्ये नविन उंटाची भरती करीत आहेत. स्पष्टच आहे की शत्रुंचे घोडे आमच्या वासाला घाबरले आहेत.

कॅमेलीया: ओ नाही, तू एवढा दुर्गंधी आहेस की त्यांना तुला घ्यावेच लागेल!

कॅमेलॉट: मला माहित आहे, परंतु मला खरेतर युद्धामध्ये जायचे नाही. मला असे म्हणायचे आहे की मला माझ्या देशाची मदत करावयाची आहे, परंतु मला कोणालाहि ईजा सुध्दा करावयाची नाही. मला समजत नाही मी काय करावे! म्हणजे नेहमीपेक्षा आणखी काय करावे.

कॅमेलीया: तू काय करणार आहेस?

कॅमेलॉट: मी उड्डाणाचा विचार करीत होतो, परंतु मला उंचीची भिती वाटते. ओ, मी लपून राहील, म्हणजे मग त्यांना मी दिसणार नाही. (मंचाखाली वाकतो, अशारीतीने की त्याचे डोके आणि कान दिसतात).

कॅमेलीया: अं...मी अजूनहि तुला पाहू शकत आहे.

कॅमेलॉट: वोह! तुला क्ष किरण दृष्टि असली पाहिजे. मी... मोराचे रूप घेऊ शकतो. (कॅमेलॉटच्या मागे हाताचा पंखा धरा).

कॅमेलीया: मोठा, केसाळ, घाणेरडा मोर.

कॅमेलॉट: हे! मोराविषयी असे म्हणणे चांगले वाटत नाही! बरं, याला काही अर्थ नाही. यातून बाहेर पडण्याचा मला दुसरा मार्ग दिसत नाही.

कॅमेलीया: तू प्रार्थना करून देवाची मदत मागू शकतोस! जरी आपण मार्ग पाहू शकत नाही, तरी तो पाहू शकतो.

कॅमेलॉट: प्रिय देवा, कृपाकरून माझी मदत कर आणि मला वाचव! कहीहि होवो, मी तुजवर विश्वास ठेवतो. ओह, आता वेळ झाली आहे. मला जावे लागेल. (मंचावरून बाहेर जातो)

कॅमेलीया: होय देवा, त्याची मदत कर.

उद्घोषक: काही वेळ निघून जातो...

कॅमेलॉट दृश्यामध्ये प्रवेश करतो: बापरे ते एक विचीत्र युद्ध होते!

कॅमेलीया: तू युद्धावर गेला होता? मला वाटले होते कि देव तुला त्यातून बाहेर ठेवील.

कॅमेलॉट: होय, मला पण असेच वाटले. परंतु माझा घाणेरडा वास येत असल्यामुळे कोणीहि मजजवळ येणार नाही, म्हणून मी कोणाला ईजा केली नाही!

कॅमेलीया: (हसते, पण थांबण्याचा प्रयत्न करते) मला क्षमा करा. ते गंमतीचे नाही, परंतु ते तुझ्या कामात आले हे बरे झाले!

कॅमेलॉट: युध्द करण्यासाठी कोणीहि जवळ नसल्यामुळे, आम्ही युध्द करण्याऐवजी लोकांना वाचवित फिरलो. एकाला चक्कर आली होती. दुस-याचा अंगठा इतका वाईटरीतनीने घासला होता की त्याला टाके मारावे लागले

कॅमेलीया: अरे, हे फार वाईट झाले. इतक्या वाईटरीतीने माझे स्वच्छता यंत्र घासले जाण्याची कल्पना मी करू शकत नाही. तू ते काय घातले आहेस?

कॅमेलॉट: लोकांना वाचविल्याबद्दल त्यांनी मला पदक दिले आहे. असो, मला आनंद वाटतो की युद्ध संपले आहे. अन्न चागंले होते, पण मला घरच्या धान्याची कमतरता भासत आहे. सांगायचे म्हणजे मला त्याची भूक लागली आहे.

## मुख्य धडा 2

या व्ही बी एस मध्ये पुन्हा स्वागत आहे, जेथे आपण देवासाठी निर्भय असणे शिकत आहोत. काहीहि झाले तरी आपण देवाची आज्ञा पाळावी हे आपण मागच्या वेळेला शिकलो. आज आपण शिकणार आहोत की जेव्हा तशाप्रकारे खंबीर राहिल्याचे परिणाम असतात तेव्हा काय होते. नबुखद्नेसर राजाने मोठी सुवर्ण मुर्ती तयार केली आणि आपल्या अधिका-यांना सांगितले की त्यांनी मुर्तीसमोर झुकून तिची भक्ती करावी. देवाने सांगितले की केवळ त्याचीच भक्ती करावी आणि सेवा करावी. पुन्हा, आपले मित्र शद्रक, मेशक आणि अबेद्नगो (राजाने त्यांची हनन्या, मिशाएल आणि अज-या ही नावे बदलली होती) आपल्या भुमिकेवर खंबीर राहिले आणि त्यांनी देवाची आज्ञा मोडण्यास नकार दिला. सर्वजण म्हणा, "शौर्य देवावर भरवसा ठेवते!"

राजाने त्यांना शेवटची संधी दिली, धमकी दिली की जर त्यांनी मुर्तीची भक्ती केली नाही तर त्यांना धगधगीत अग्नीच्या भट्टीत टाकण्यात येईल. ते म्हणाले, "आमचा देव आम्हास वाचविण्यास समर्थ आहे. पण जरी त्याने वाचविले नाही, तरी आम्ही मुर्तीची भक्ती करणार नाही." आमचा देव सर्वात महान, विश्वामध्ये सर्वात सामर्थ्यशाली आहे, आणि आम्ही त्याची आज्ञा पाळली पाहिजे. आपण पृथ्वीवर त्याच्यासाठी जे काही करतो त्यासाठी स्वर्गात नेहमीसाठी प्रतिफळ देण्याचे तो वचन देतो. आम्ही केवळ देवाचे भय धरले पाहिजे, परंतु तो आपल्यावर प्रेम करतो आणि कशापासुनही आपले संरक्षण करण्या एवढा तो शक्तीमान आहे, मरणापासून देखिल! शद्रक, मेशक आणि अबेद्नगो यांनी ते लक्षात घेतले आणि त्यांनी देवावर विश्वास ठेवला आणि आपल्याला त्याच्या हातामध्ये समर्पित केले की त्याला जसे वाटते तसे त्याने त्यांचे संरक्षण करावे, मग ते पृथ्वीवर असो की स्वर्गात असो. सर्वजण म्हणतील, "शौर्य देवावर भरवसा ठेवते!"

नबुखद्नेसर राजा एवढा भडकला की त्याने भट्टी 7 पट तापविली आणि शद्रक, मेशक आणि अबेद्नगोला त्या भट्टीत फेकून दिले! आपण असा विचार करू शकतो की भट्टीत पडण्यापूर्वी देवाने त्यांचा बचाव करायला पाहिजे होता. कधीकधी

आपल्याला वाटते शाळेतील दादागिरी करणारा मुलगा जशा सर्व समस्या चूटकीसरशी सोडवितो, तशाप्रकारे देवाने आपल्या कठीण समस्या सोडविल्या पाहिजेत, अभ्यासातील अडचण, आपल्या पालकांना झालेला कर्करोग, किंवा दुस-या शहरातील स्थलांतर. कधीकधी तो असे करतो, आणि आपण त्याने तसे करावे अशी त्याला विनंती केली पाहिजे. या गोष्टीमध्ये देवाने त्यांना भट्टीबाहेर ठेवले नाही, परंतु तरी त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. आपण पाहू काय झाले! सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य देवावर भरवसा ठेवते!’’

नबुखद्नेसर आश्‍चर्यचकीत झाला की ते भट्टीमध्ये चौथ्या मनुष्यासोबत चालत आहे, जो ‘‘देवाच्या पुत्रासारखा आहे.” त्यांना ईजा झालेली नाही. त्या धगधगीत भट्टीमध्ये देव त्यांच्यासोबत होता! तसेच, तुम्ही पण जेव्हा कठीण परिस्थितीतून जाल, त्या परिस्थितीमध्ये देव तुमच्यासोबत असेल. देवाने आपल्याला वचन दिले आहे की तो आपल्याला कधीहि सोडणार नाही किंवा टाकणार नाही. तसे पाहिले तर, चांगल्या परिस्थितीपेक्षा, कठीण परिस्थितीमध्ये तो अधिक जवळ असतो, आणि त्या परिस्थितीमध्ये तो आपल्या जीवनामध्ये आपले सामर्थ्य प्रगट करू शकतो. पाहा, देव आपल्यावर किती प्रेम करतो! सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य देवावर भरवसा ठेवते!’’

शद्रक, मेशक आणि अबेदनगो भट्टीतून कोणतीहि ईजा न होता बाहेर आले आणि त्यांच्यावर धुराचा वास सुध्दा नव्हता. देवाच्या मदतीने तुम्ही कठीण परिस्थितीतून कडवटपणा, राग, भय किंवा चीड विरहीत बाहेर पडू शकता, पण त्याऐवजी तुम्ही देवाचे प्रेम, आनंद, शांती आणि क्षमा घेऊन बाहेर याल. नबुखद्नेसर राजाला कळून चुकले की आपला देव सर्वोच्च देव आहे. एके दिवशी येशू पुन्हा येणार आहे आणि सर्व जग येशूसमोर गुडघे टेकतील आणि कबूल करतील की तो सर्व जगाचा राजा आहे.

आपले पाप, जे सर्वकाही आपण चूक करतो, त्या गोष्टी आपल्याला देवापासून विलग करतात. वधस्तंभावर मरण पावून येशूने किंमत मोजून दिली आणि नंतर तो पुन्हा जीवंत झाला. जो कोणी येशूवर विश्वास ठेविल त्याचा नेहमीसाठी बचाव होईल, परंतु जो विश्वास ठेवणार नाही तो वाचणार नाही. आज तुम्ही येशूवर विश्वास ठेवाल का आणि त्याने तुम्हाला तुमच्या पापापासून सोडवावे आणि नेहमीसाठी तुमच्या जीवनाचा मालक व्हावे असे तुम्ही त्याला सांगाल का? प्रार्थना करा: ‘‘प्रभु येशू, मला माहित आहे की तू सर्व जगाचा राजा आहेस. येशू, कृपाकरून तू माझ्या पापांची क्षमा करशील का आणि माझ्या जीवनाचा प्रभु होशील का? तू मला नेहमीसाठी वाचवावे म्हणून मी तूजवर विश्वास ठेवतो!’’

## सामाज्यात हस्तकृती 2

### *भट्टी*



**_साहित्य_**

*कागदी भट्टीचा पाया

*अग्नी ज्वाला दाखविणारे कागद तुकडे

*रंग

*डिंक


**_सूचना_**

*भट्टी आणि ज्वाला कापून ठेवा. भट्टीचा मध्यभाग ज्वाला आणि मनुष्य असे दाखवत रंगवा (लक्षात ठेवा की मनुष्यांना काही ईजा झाली नव्हती).

*आगीच्या ज्वाला तप्त अग्नी दिसेल अशाप्रकारे नारंगी, पिवळया आणि लाल रंगाने रंगवा.


*ज्वाला तुकडे घडी करा आणि त्यांना डिंकाने भट्टीला अशाप्रकारे चिटकवा की ती दाराप्रमाणे उघडेल.

## राजवाडयामध्ये वर्ग















## नेमून दिलेले काम 2

असे क्षण लिहून ठेवा जेव्हा तुम्ही देवाचा विचार कराल किंवा देव जवळ आहे असे तुम्हाला वाटेल, आणि त्याबाबत उद्या आपल्या शिक्षकांना सांगा.

## प्रश्न आणि उत्तरे 2

1. **राजाने तयार केलेल्या मुर्तिची भक्ती केली नाही म्हणून कोणती शिक्षा मिळणार होती?**
   तप्त भट्टीत फेकून देणे ही शिक्षा होती.
2. **जर देव ख्रिस्ती व्यक्तीला त्रासातून सोडवत नसेल तर त्याने काय सिध्द होते?**
   काही संभाव्य उत्तरे: विश्वासाची परीक्षा, बचाव करण्याची देवाची शक्ती दाखविणे, आपल्या त्रासामध्ये तो आपल्या सोबत चालत आहे याचा अनुभव घडावा म्हणून, आपल्या विश्वासामध्ये इतरांना साक्ष व्हावे म्हणून.
3. **कोणत्या प्रकारचे त्रास आहेत ज्यामुळे देव तुम्हाला सोडून देईल?**
   इब्री 13:5, "मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही ."
   पाप आपल्याला देवापासून विभक्त करते, परंतु ख्रिस्ताद्वारे आपला देवासोबत समेट होतो. सर्व प्रसंगी तो आपल्या सोबत आहे याचा अनुभव घेण्यासाठी, मग आपण कोणत्याहि त्रासातून जात असू, आपण येशूला तारणारा म्हणून स्विकारले पाहिजे.
4. **तप्त भट्टीमध्ये कोण होता?**
   शद्रक, मेशक, अबेदनगो आणि देव = 4. तेथे सिंह नव्हते.
5. **तुमचे तारण कसे होईल?**

तुम्ही अशी प्रार्थना करू शकता: "प्रभु येशू, मला माहित आहे की तू पूर्ण जगाचा राजा आहेस. येशू, तू मला माझ्या पापांची क्षमा करशील का आणि माझ्या जीवनाचा प्रभु होशील का? तू मला नेहमी तारशील असा मी विश्वास ठेवतो."

## दानीएला बरोबर नाटक 2

शिक्षक: दानीएला, तुझे पुन्हा स्वागत आहे!

दानीएल: आभार मानतो. तुमच्यामध्ये पुन्हा आलो म्हणून आनंद वाटतो आणि आपल्या महान देवाबाबत बोलण्यासाठी आणि माझे मित्र शद्रक, मेशक, आणि अबेदनगो यांची विचीत्र गोष्ट सांगण्यासाठी मी आनंदीत आहे. नबुखदनेसर राजाने भव्य पुतळा तयार केला आणि त्याची प्रतिष्टापना करते वेळी आपल्या अधिका-यांना त्याने त्याची भक्ती करण्यास सांगितले. ओह, जर लोकांनी लक्षात घेतले की पुतळा देव असू शकत नाही, कारण तो पाहू शकत नाही किंवा बोलू शकत नाही किंवा काहीच करू शकत नाही. परंतु इतिहासामध्ये लोकांनी नेहमी लहान गोष्टींची भक्ती केली आहे. माझ्या मित्रांनी पुतळयाची भक्ती करण्याचे नाकारले. त्यांनी आशा बाळगली की कोणी त्यांना पकडणार नाही, परंतु दुस-या काही लोकांनी


त्यांच्याबाबत राजाला सांगितले. आमच्या आजूबाजूच्या लोकांपेक्षा आम्ही नेहमीच वेगळे होतो आणि त्यामुळे आम्ही त्यांना आवडत नव्हतो आणि कधीकधी त्यांनी आम्हाला खाली पाडण्याचा प्रयत्न केला. जेव्हा आजुबाजूचे लोक तुम्ही जे काही करता त्याबाबत तुमच्या सोबत सहमत नसतील तेव्हा काळजी करू नका. तुम्हाला ठरवावे लागेल की कोणाचे मत विचारात घेण्यासारखे आहे, विशेषतः जेव्हा तुम्ही बालक किंवा तरूण असता. तुम्ही कोणासोबत वेळ घालविता याची शहाणपणाने निवड करा. माझे मित्र शद्रक मेश्क आणि अबेदनगो यांच्यासाठी मी देवाचा ऋणी आहे. देवाला अनुसरण्यासाठी आम्ही नेहमीच एकमेकांना उत्तेजन दिले आणि त्यांच्या निर्भयतेने मी खरोखर प्रभावित झालो आहे. कधीकधी त्यांना माझ्या उत्तेजनाची गरज भासते आणि कधीकधी मला त्यांच्या उत्तेजनाची गरज भासते. अशाप्रकारचे मित्र शोधण्याचा प्रयत्न करा. ठीक आहे, त्यांना पकडण्यात आले आणि शिक्षा होती तप्त भट्टीमध्ये टाकून देणे! जेव्हा त्यांनी नकार दिला आणि काहीहि झाले तरी देवावर विश्वास ठेवायचे ठरविले, तेव्हा राजा एवढा क्रोधाविष्ट झाला की त्याने भट्टी आणखी जास्त तापविली, इतकी की ज्या लोकांनी त्यांना भट्टीत टाकले तेच मरून गेले..

परंतु माझे मित्र जगले! ते ती गोष्ट मला सांगत होते तेव्हा मी फार चकीत झालो, कारण ते पुर्वीप्रमाणेच दिसत होते. धुर नव्हता, केस किंवा कपडयांना आच लागली नव्हती. त्या गोष्टीने राजाला सुध्दा प्रभावित केले. त्याने आमच्या देवाची स्तुती केली आणि लक्षात घेतले की आमचा देव सर्वात महान आहे आणि सर्व गोष्टी त्याच्या नियंत्रणात आहेत. मला वाटते सर्वात उल्लेखनीय गोष्ट ही आहे की अग्नीमध्ये चौथा मनुष्य होता. राजा म्हणाला की तो "देवाच्या पुत्रासारखा" होता. मला खातरी नाही की तो देवदूत होता किंवा कोण होता, परंतु स्पष्ट आहे की देव त्यांच्यासोबत अग्नीमध्ये होता. मला तर असे वाटते की मी तेथे असतो तर मला परिस्थिती समजली असती. एके दिवशी मी देवाला स्वर्गामध्ये पाहाणार आहे. असो, मला आनंद वाटतो की असे देवावर विश्वास ठेवणारे निर्भय मित्र मला मिळाले आहेत. राजा आणि इतर सर्वजण हे पाहून प्रभावित होतात की माझे मित्र देवाला किती समर्पित आहेत. ते पाहून त्यांना असे वाटते की त्यांना कशाची तरी कमतरता आहे. कुणास ठाऊक? यामुळे कोणीतरी देवाकडे वळेल आणि लहान गोष्टींची भक्ती करणे सोडून देतील.

शिक्षक: हे खरे आहे का की जरी देवाने त्यांचा बचाव केला नसता तरी त्यांना ठीक वाटले असते?
दानीएल: होय. देवावरील विश्वासाची ती पातळी माझ्या मित्रांमध्ये आहे. तुम्हाला ठाउक आहे की एके दिवशी आपण सर्वजण नेहमीसाठी देवासोबत स्वर्गामध्ये राहू. मला त्यांची फार उणीवता भासली असती, परंतु त्यांच्यामध्ये सामील होण्यासाठी सुध्दा मी वाट पाहिली असती. परंतु देवाने या प्रकारे त्यांना वाचविण्याचे ठरविले आणि राजाने राज्यातील सर्वांना आज्ञा केली की कोणीहि आमच्या देवाविरूध्द काहीहि बोलू नये. आमचा देव महान आहे आणि सर्व लोकांकडून त्याची स्तुती होईल.

## कार्यानूभव 2

***मी भरवसा ठेवतो***



गट गोल तयार करतो. एक व्यक्ती असे म्हणून सुरूवात करते, "मी देवावर विश्वास ठेवतो जेव्हा मी नविन दिवस पाहातो." दुसरी व्यक्ती म्हणते, "मी देवावर विश्वास ठेवतो जेव्हा मी नविन दिवस आणि माझ्या वडीलांना हसतांना पाहातो. प्रत्येक व्यक्ती आधीचे वाक्य पुन्हा बोलते आणि त्यामध्ये भर टाकते. ध्येय हे आहे की तुमच्या आधीची व्यक्ती जे काही बोलली ते लक्षात ठेवणे.

जर वेळ असेल तर पुन्हा खेळा, विरूध्द बोला. ‘‘मी देवावर विश्‍वास ठेवतो, जरी मला नविन दिवस दिसत नाही आणि माझे वडील हसत नाहीत.’’

## शाही मेजवानी 2

### *फळ आग*



***घटक:***

- द्राक्षे
- पिवळे किंवा नारंगी फळ किंवा भाजीपाला (आंबा, अननस आणि / किंवा गाजर)
- प्रेटझेल्स (किंवा कुरकुर आवाज करणारा पदार्थ जो लाकड सारखा दिसेल)
- सुरी
- भांडे



***सूचना :***

1. पिवळया फळाचे ज्वालेच्या आकाराचे तुकडे करा.(तुरे)
2. फळ भांडयामध्ये ठेवा आणि दगडांना गरम करण्यासाठी सभोवती द्राक्षे ठेवा
3. प्रेटझेल किंवा लाकडासाठी तुम्ही निवडलेले तळलेले अन्न ठेवा..

***तयार! न भाजणा-या आगीचा आपण आनंद लुटू शकतो!***

***आपण विसरू नये... ज्याप्रकारे देव त्यांच्यासोबत भट्टीमध्ये होता, तसाच देव वेगवेगळया परिस्थितीमध्ये आपल्यासोबत आहे!***

## बागेतील खेळ2





उंट नाच

संगित वाजवा आणि लेकरांना उंटाप्रमाणे नाचण्यास सांगा. त्यांना कल्पना यावी म्हणून तुम्ही त्यांना उंट नाचाची चित्रफित दाखवू शकता. जेव्हा तुम्ही संगीत थांबवाल तेव्हा

सर्व लेकरांनी स्थिर उभे राहिले पाहिजे. जो कोणी हालचाल करील तो खेळातून बाद होईल आणि त्याला बसावे लागेल. जोवर 1 जण उरत नाही तोवर संगीत पुन्हा पुन्हा वाजवत राहा.

**रस्सी खेच** ...

या खेळासाठी तुम्हाला जाडजूड रश्शी लागेल जी लेकरांना इजा करणार नाही. उपस्थित असलेल्या लेकरांनूसार चमू तयार करा (जसे की 4 किंवा 6 चमू). दोन चमू एकाच वेळी खेळतील, आपल्या बाजूची रश्शी अशाप्रकारे ओढतील की रश्शीचा मध्यभाग जमिनीवर ओढलेल्या रेषेच्या पलीकडे जावा. विजेती चमू ठरेपर्यंत स्पर्धा चालू ठेवा.



# ३. शौर्य सत्य सांगते

## दानीएल 4: वाईट बातमीचे स्वप्न

### लक्ष वेधक / टाळया ३

"शौर्य सत्य सांगते"

1. मेगाफोन प्रमाणे आपले हात तोंडावर ठेवा.
2. डोके मोठया गोल आकारात हलवा, असे म्हणा, "इइइइइहूहूहू"
3. हात हिप हॉप पध्दतीने हलवा आणि म्हणा, "तुम्हाला आमचा आवाज येतो का?"

### पाठांतर वचन ३

करिंथकरांस पहिले पत्र 13:6 "ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते."

### नाटक ३: उंट नाच

कॅमेलीया: कॅमेलॉट!! मदत कर, कॅमेलॉट!!

कॅमेलॉट देखाव्यात लगेच प्रवेश करतो: काय? काय?? काय तेथे कोळी आहे का? खोल पाण्यातून महामोठा समुद्र मासा वर आला आहे का? आग कुठे आहे? मी आगीवर थुंकणार! (थुकण्याची तयारी करतो).

कॅमेलीया: नाही, नाही. माझे नाच करण्याचे बुट घालण्यासाठी बोलावले आहे. (लेडीज बुट दाखवा).

कॅमेलॉट: मी तुझे जोडे का घालू?

कॅमेलीया: नाही तू घालू नको. मला जोडे घाल! आता नाच प्रदर्शित करण्याची वेळ जवळ जवळ झालीच आहे.

कॅमेलॉट: सादरीकरण? तू मला तुझ्या रहस्यमय डोंबारी भूतकाळाबद्दल किंवा ओपेरा गायिका आहेस त्याबद्दल कधी सांगितले नाही?

कॅमेलीया: मी उंट नाच स्पर्धेमध्ये आहे, अर्थातच! मी खूप उत्सूक आहे. माझे अंगठे मंचावर नेणे ही अडचण आहे.

कॅमेलॉट: इकडे आण. मी प्रयत्न करतो. (थोडया उड्या मारतो आणि मंचाच्या मागे पडतो). आहा! *पडला*

कॅमेलीया: पाहिले? ते कठीण आहे! पण मी ते करू शकते, कारण मी चांगली नाचते. मला तालीम करण्याची सुध्दा गरज नाही, कारण मी फारच कलासक्त आहे. स्पर्धेच्या या पातळीपर्यंत मी स्वप्रयत्नाने आली आहे.

कॅमेलॉट: तुझी फुशारकी बरी नाही.

कॅमेलीया: पण ते खरे आहे!

कॅमेलॉट: सत्य हे आहे की देवाने तुला ती कला दिली आहे आणि तुझ्या मालकाने सर्व स्पर्धांमध्ये सुधारणा करण्यास तुला संधी दिली आहे.

कॅमेलीया: तू फक्त बघ. मी ही स्पर्धा सहजपणे जिंकेन.

कॅमेलॉट: मी काही टिशू कागद आणि जखम बांधण्याची पट्टी आणतो!

कॅमेलीया: दणदण आवाज करून निघून जाते.

उद्घोषक: स्पर्धा संपल्यावर...

कॅमेलॉट झोपला आहे आणि घोरत आहे.

कॅमेलीया जोरजोरात रडत आतमध्ये येते.

कॅमेलॉट: काय झाले? (कॅमेलीयाला रूमाल देतो).

कॅमेलीया (आपले नाक टिशू कागदावर जोरात शिंकरते...) मी जिंकले नाही! परीक्षक निपक्षपाती नव्हते. मी जिंकायला पाहिजे होते! दुसरा उंट दोन वेळा अडखळला! आणि माझी पुनरावृत्ती परिपूर्ण होती! पाहा, मी तर एकदाच अडखळले...ठीक आहे कदाचित 3 दा 4 दा. (उसासा टाकते) 7 दा.

पण तरी पण मीच जिंकायला पाहिजे होते!

कॅमेलॉट: तर तू सात वेळा अडखळलीस आणि तरी पण तुला वाटते की तू जिंकायला पाहिजे होते? तसे असेल तर मी 100 वेळा अडखळून जिंकलो असतो!

कॅमेलीया: हे! ठीक आहे...नाही हे वेगळे आहे, कारण - ओह, तू बरोबर आहेस. परीक्षक निपक्षपाती होते. मी खराब नाचले आणि हरले! (पुन्हा रडते, जोरात ओरडते).

कॅमेलॉट: तुझे असे रडणे म्हणजे अजूनहि गर्व आणि स्वदया आहे. कॅमेलीया, आपण सत्यावर पुन्हा विचार करू.

कॅमेलीया: (नाक मुरडते) तुला काय म्हणायचे आहे?

कॅमेलॉट: माझ्यासोबत म्हण. सत्य हे आहे की, मी ख्रिस्ताच्या मालकीची आहे. माझी कला देवापासून आहे. ती कला देवाने मला दिली आहे, आणि तो सहजपणे ती पुन्हा घेऊ सुध्दा शकतो... परंतु कशानेहि माझी किंमत कमी होत नाही किंवा तो मजवर किती प्रेम करतो हे कमी होत नाही. जे झाले त्याबाबत मी त्रासदी करून घेत नाही, परंतु त्यापासून शिकेन आणि देवाला विनंती करीन की पुढील वेळेला चांगले करण्यासाठी त्याने माझी मदत करावी.

(कॅमेलीया कॅमेलॉटच्या मागे बोलते).

कॅमेलॉट: आता बरे वाटते?

कॅमेलीया: हो, थोडेसे.

कॅमेलॉट: छान, कारण मला जरा झोपेची गुंगी होती ....पण आता....मला भूक लागली आहे!

## मुख्य धडा ३

या व्हीबीएस मध्ये आपले पुन्हा स्वागत आहे! लक्षात ठेवा शौर्य देवाला प्रथम स्थान देते आणि देवावर भरवसा ठेवते. ‘‘शौर्य सत्य सांगते!’’

नबुखदनेसर राजाला एका महाकाय वृक्षाचे स्वप्न पडले, जो सर्व जगाला सावली देत होता आणि काळजी घेत होता. मग झाड कापण्यात आले, आणि निरोप्या म्हणाला, तो गवत खाईल आणि त्याचे केस आणि नख वाढतील. राजाने मित्र दानीएलाला स्वप्नाचा अर्थ सांगण्यास बोलावले, कारण सर्वांना माहित होते की देव दानीएला बरोबर आहे. देवाने दानीएलला स्वप्नाचा अर्थ प्रकट केला आणि त्याचा अर्थ होता राजा वेडा होईल आणि त्याला असे वाटेल की तो जनावर आहे. कल्पना करा जगातील सर्वात शक्तीशाली राजासमोर उभे राहणे आणि त्याला वाईट बातमी सांगणे किती भयप्रद असेल. तुम्ही काय कराल? अनुकूल अर्थ सांगून तुम्ही लबाडी कराल किंवा सत्य सांगाल? सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य सत्य सांगते!’’

दानीएलाने वाईट बातमीचे सत्य राजाला सांगितले. केवळ इतकेच नाही, परंतु त्याने आदरपूर्वक सांगितले की राजाने पश्चाताप करावा. येशू कृपा आणि सत्य सुध्दा घेऊन आला. त्याने लोकांवर एवढे प्रेम केले की त्याने आपल्या पापाची जाणीव करून दिली आणि कधीच असे म्हटले नाही की कोणतेहि पाप ठीक आहे. नंतर येशूने पापाची किंमत वधस्तंभावर

प्राण देऊन मोजून दिली आणि तो सांगतो की आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा, पश्चाताप करावा आणि आपण जे काही करतो त्यामध्ये बदल करावा. अशाचप्रकारे, आपण इतरांसोबत प्रेमाने सत्य बोलावे. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य सत्य सांगते!’’

एका वर्षानंतर, राजाने आपल्या राजवाडयाकडे पाहिले आणि तो म्हणाला मी हा राजवाडा माझ्या सामर्थ्याने बांधला आहे आणि माझ्यासाठी बांधला आहे. जेव्हा तुम्हाला शाळेत चांगली बातमी ऐकायला मिळते, लोक तुमची प्रशंसा करतात, जेव्हा तुम्ही मोठया घरामध्ये राहाता, खेळामध्ये चांगले करता, किंवा काही पण साध्य करतो तेव्हा गर्वाच्या पाशात पडणे कितीतरी सोपे आहे. गर्व म्हणतो हे तू केले आहेस, परंतु सत्य हे आहे की देवाने तुम्हाला तुमची वरदाने दिली आहेत. गर्वाला वाटते तुम्ही शक्तीमान आहात, परंतु सत्य हे आहे की देव तुमच्या पूर्ण आयुष्याचे नियंत्रण करतो. गर्वाला वाटते यश तुमच्यासाठी आहे, परंतु सत्य हे आहे की ते देवाच्या गौरवासाठी आहे आणि इतराच्या लाभासाठी आहे. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य सत्य बोलते!’’

राजाच्या गर्वीष्ट भाषणानंतर लगेच, राजा भ्रमिष्ट झाला! तो बाहेर राहिला आणि बैलाप्रमाणे गवत खावू लागला आणि त्याचे केस आणि नख वाढून मोठे झाले. पुष्कळ वेळानंतर, राजाने वर स्वर्गाकडे पाहिले आणि सत्य सांगितले: देव सर्वकाळ सार्वभौम आहे. आपण नियंत्रणात नाही हे कबूल करणे आणि जीवन आपल्याबाबत नाही हे सांगणे भयप्रद असू शकते. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य सत्य बोलते!’’

राजाला देवाचे सामर्थ्य आणि सार्वभौमत्व समजल्यावर, त्याला त्याचे राज्यच पुन्हा मिळाले असे नाही, परंतु त्याचे राज्य वाढले आणि तो आणखी सामर्थ्यवान झाला. मग राजाने काहीतरी आश्चर्यकारक केले. सर्वात शकतीमान राजाने पृथ्वीवरील सर्व लोकांना एक पत्र लिहीले आणि त्याच्या सामर्थ्यहिनतेची गोष्ट त्यांना सांगितली आणि आपल्या सामर्थ्यशाली देवाची स्तुती केली! जेव्हा देव तुमच्या जीवनामध्ये काहीतरी करतो, त्याबाबत सर्वांना सांगा, जरी सत्य तुम्हाला वाईट दिसत असेल. देवाची स्तुती होईल आणि तो तुम्हाला सर्वकाळासाठी बक्षिस देईल आणि तुमच्या गोष्टीकडून इतरांना सुध्दा लाभ होऊ शकतो. आपण प्रकटीकरणामध्ये शिकतो की आपण येशूच्या रक्ताद्वारे आणि आपल्या साक्षीच्या शब्दांद्वारे शत्रुवर जय मिळवितो, आपल्या जीवनावर प्रेम करून नाही. सत्य सांगून आपण जिंकतो. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य सत्य सांगते!’’

## सामाज्यात हस्तकृती ३

### ***बाबेलची टोपी***



***साहित्य***

* कगदी नमूने
* रंग
* डिंक
* पिरगळलेली रिबन, 50 सेंमी

**सूचना**


*टोपीचा आकार कापा आणि त्याला रंग लावा.


*खुणा केलेल्या जागी मुडपा आणि टोपी थोडीशी पुढे करा जणूकाय तिचे वेगवेगळे 3 तुकडे झाले आहेत.


*पिरगळलेली रिबन डोक्याला बांधता येईल अशाप्रकारे दोन्ही बाजूच्या छिद्रामध्ये टाका.

*चमकीने सजवा.

## राजवाडयामध्ये वर्ग ३










| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दा | ग | आ | वा | ई | ट | ग | दा | खा | णे | आ |
| अ | दा | अ | दा | सा | सा | अ | प | शौ | ग | अ |
| ग | प | स | प | र्व | आ | सा | सां | ग | र्य | ग |
| व | आ | ग | त्य | भौ | ग | नं | आ | गा | आ | दा |
| त | अ | ग | अ | म | प | दा | द | ग | अ | दा |
| आ | दा | आ | र्व | प | दा | श्चा | अ | क | दा | नी |
| ग | झा | ग | सा | आ | स्व | आ | ता | दा | रा | ए |
| दा | प | ड | दा | अ | ग | प्न | ग | प | ग | ल |
| अ | दा | ग | अ | र्थ | सां | ग | णे | दा | अ | आ |
| आ | आ | नं | द | घे | णे | दा | आ | ग | ये | शू |



1 2 3 4 5 6 7 8



## प्रश्न आणि उत्तरे

1. **नबुखदनेसर राजाने दानीएलाला स्वप्नाचा अर्थ का विचारला?**
   सर्वांना माहित होते की दानीएला बरोबर देव आहे. दानीएलाने दाखवून दिले होते की तो देवावर विश्वास ठेवतो.
2. **इत्तर सल्लागारांनी राजाला काय सांगितले असते, जे राजाच्या स्वप्नाचा आनंदी शेवट ठरला असता?**
   संभाव्य उदाहरणे: वृक्ष सावली देतो, गरम सुर्यापासून आणि त्रासापासून सरंक्षण देतो. गवते खाणे म्हणजे आहार नियंत्रण करणे आणि अधिक निरोगी होणे आहे. नखे वाढविणे म्हणजे तणाव विरहीत जीवन. स्वप्नातील वाईट बातमी दुस-या कोणाला तरी लागू पडते.
3. **तुमच्याकडे असे काय आहे जे देवापासून तुम्हाला मिळाले आहे?**
   विद्‌यार्थ्यांकडून सर्व उत्तरे स्विकारा, वरदाने आणि व्यक्तिमत्व, वारसा सूचवा.
4. **शेवटी राजाच्या लक्षात काय आले?**
   की देव नेहमी सार्वभौम आहे.
5. **तुमच्या सरकारपेक्षा देवाचे सामर्थ्य आणि अधिकार कसा समान आहे किंवा वेगळा आहे?**
   सैन्यावर अधिकार... देवाकडे देवदूत आहेत, सरकारकडे सैन्य आहे. देवाकडे आज्ञा आहेत ज्या पाळण्याची आपण निवड करू शकतो. सरकारचे कायदे आहेत जे आम्ही पाळले पाहिजे. जेव्हा आपण चुक करतांना पकडले जातो, तेंव्हा सरकार लोकांना शासन करते, जसे की तुरूंग, देवाने आपला पुत्र पाठविला, येशू, आपल्या चुकांचा मोबदला देण्यासाठी, यासाठी की आपल्याला शिक्षा होऊ नये . कधीकधी सरकार बदलते, देव कधीच बदलत नाही. आपल्यासाठी देवाचे भविष्य म्हणजे त्याच्यासोबत नेहमीसाठी स्वर्गात राहणे, सरकार आपल्या सार्वकालीक भविष्यासाठी काहीच करू शकत नाही.

## नेमून दिलेले काम

उर्वरीत दिवसामध्ये ''मी'' म्हणणे टाळा. जेव्हा तुम्हाला 'मी' शब्द बोलण्याचा मोह होईल तेव्हा स्वतःला सांगा, "सर्वकाही माझ्याबाबत नाही", आणि त्यापेक्षा इतरांवर लक्ष केंद्रित करा.

शिक्षक: पुन्हा स्वागत, दानीएल!

दानीएल: आभार मानतो. पुन्हा आलो म्हणून छान वाटते. आज माझ्याजवळ आणखी एक अद्भूत गोष्ट आहे. मी सरकारी कार्यालयात माझे काम करण्यात मग्न असतांना राजाने मला आत बोलावले. त्याला एक स्वप्न पडले होते जे इतके खरे वाटत होते की ते तुम्ही कधीच विसरू शकणार नाही. या आधी राजाच्या स्वप्नाचा अर्थ सांगण्यासाठी देवाने माझी मदत केली होती. जेव्हा जादुगार आणि मांत्रिक यावेळी सुध्दा त्या स्वप्नाचा अर्थ सांगू शकले नाहीत, तेव्हा राजाने मला आत बोलाविले. त्याला माझ्या देवाविषयी जास्त समजत नाही, परंतु त्याला हे समजले आहे की देव माझ्या सोबत आहे. त्याने एका विशाल वृक्षाबाबतचे आपले स्वप्न मला सांगितले, ज्याने पूर्ण जग व्यापले होते, ते कसे कापले गेले, आणि त्याला लोखंड आणि तांब्याने कसे बांधण्यात आले, आणि स्वर्गातून उतरलेल्या जागल्याचा पुकारा की तो बाहेर वस्ती करील, गवत खाईल आणि त्याला पशुचे हृदय प्राप्त होईल. तो मला सांगत असतांना, देवाने मला स्वप्नाचा अर्थ दिला आणि मला कळले की राजासाठी ती वाईट बातमी होती की तो आपले चित्त गमवील, भ्रमीष्ट होईल, त्याला वाटेल की तो पशु आहे आणि काही काळ बाहेर राहील आणि त्याला त्याचे राजपद पुन्हा मिळेल.

शिक्षक: राजासाठी वाईट बातमी असणे भयंकर गोष्ट असावी. राजा तुझ्यावर नाराज झाला का?

दानीएल: होय. ती गोष्ट फार भितीदायक होती. काही वर्षापासून मी राजाचा विश्वास संपादन केला आहे, परंतु तरी ते धोकादायक होते. परंतु मला माहित होते की चांगली गोष्ट ही आहे की राजाला सत्य सांगावे आणि पश्चाताप करण्याची संधी द्यावी. मी सुचविले की त्याने आपला दुष्टपणा सोडून द्यावा आणि गरीबांवर दया करावी. एक पूर्ण वर्ष सरले आणि सर्वजण ही गोष्ट पूर्णपणे विसरले, जेव्हा अचानक राजा भ्रमिष्ट झाला. ते कसे घडले हे ऐकण्यासाठी मी तेथे नव्हतो, परंतु त्याने सर्व राज्याला पत्र लिहीले आणि सर्व काही स्पष्ट केले. त्याने उध्दटपणे शेखी मिरविली होती की त्याने कशाप्रकारे राज्य निर्माण केले आहे आणि सर्व वैभव त्याच्यासाठीच आहे. बराच काळ गेल्यावर, राजा सुदृढ आणि शहाणा असा वापस आला आणि लगेच तो पुन्हा राजा झाला. मग त्याने पूर्ण राज्याला पत्र लिहीले आणि या सर्व गोष्टी स्पष्ट केल्या.

शिक्षक: राजाने सर्व राज्याला हे सांगितले का की तो कसा वेडा झाला होता? बापरे त्यामुळे तर तो पुष्कळ सन्मान गमावून बसला असेल.


दानीएल: तो देवासाठी एवढा प्रभावित झाला होती की त्याने या गोष्टीची चिंता केली नाही. जेव्हा तुम्हाला समजते की देव किती महान आहे, तेव्हा तुम्ही केवळ देवाच्या म्हणण्याचीच चिंता करता. त्याने सत्य सांगितले आणि पत्रामध्ये काहीच लपवले नाही आणि सर्वात महान देवाची स्तुती केली, हे लक्षात घेतले की देव अंतिम अधिकार आहे आणि जगातील सर्व राज्ये त्याच्या हातामध्ये आहेत. पूर्ण राज्यातील आम्हा यहूदी लोकांना या गोष्टीने खूप उत्तेजन दिले की देव कशाप्रकारे येथे कार्य करीत आहे, जरी आम्ही बंदीवासात होतो. कधीकधी आपल्याला वाटते की आपण देवासाठी उभे राहिले पाहिजे

अन्यथा तो आपल्यामध्ये कार्य करण्यासाठी मर्यादीत असेल, परंतु मग तो असे काहीतरी करतो आणि स्वतःसाठी उभा राहातो आणि आम्ही आश्चर्य करीत राहातो.

शिक्षक: आभारी आहे, दानीएल, की आज तू पुन्हा आलास. उद्या एस्तेर आमच्या भेटीला येणार आहे, परंतु तुझी भेट काही दिवसांनी होईलच, बरोबर आहे?

दानीएल: मला वाटते एस्तेरची गोष्ट ऐकण्यासाठी मी उद्या येथे असायला पाहिजे होतो, परंतु दोन दिवसांनी तुम्हा सगळयांना भेटण्याची मी वाट पाहात आहे.

## कार्यानूभव ३



***सत्य सांगण्याचा उद्देश***

मुले गोलाकार किंवा अर्धगोलाकारात बसतात. एखादी वस्तु गोलामध्ये फिरविली जाते. ज्याच्या हातामध्ये ती वस्तु येईल त्याला स्वतःबाबत सत्य सांगायचे आहे. (उदाहरणार्थ, केळीच्या पोतामुळे मला केळी आवडत नाही). जोवर त्याचा शेजारी ती वस्तु त्याच्यापासून घेत नाही तोवर मुलाला आपल्याबाबत सत्य सांगायचे आहे. वस्तु फिरवत राहा आणि कोणालाहि ती वस्तु एका मिनीटाशिवाय जास्त वेळ ठेऊ देऊ नका.




## शाही मेजवानी ३

***राजाच्या स्वप्नातील झाड***





घटक:

- केळी
- हिरवे फळ आणि / किंवा भाजीपाला (द्राक्षे, कापलेली कोथिंबीर किंवा लेटस)

अतिरीक्त:

- हॅम
- गाजराचे उभे काप

सूचना :

1. केळ ताटामध्ये ठेवा, अशाप्रकारे की ते जणूकाय झाडाला रस पुरवित आहे.
2. वर हिरवे फळ ठेवा की जणूकाय ते पानांना रस पुरवित आहेत.

अतिरीक्त:

1. दोन हॅम गुंढाळया तयार करा आणि त्यांना फुलपाखराच्या आकारात ठेवा.

2. गाजराचे काप फुलपाखरावर ठेवून त्याचे शरीर तयार झाले असे दर्शवा.

***आता राजाच्या स्वप्नातील झाडाचा आनंद घ्या!***




## बागेतील खेळ ३

### *गरम बटाटे*



सर्व लेकरांचा एक मोठा वर्तूळ तयार करा, किंवा एक मुलांचा आणि एक मुलींचा वर्तूळ तयार करा. त्यांना एक फूगा, चेंडू किंवा दुसरी कोणतीहि वस्तु द्या, एका वर्तूळात 15 लेकरे ठेवा, ज्यामुळे खेळ लवकर संपेल. जेव्हा तुम्ही संगीत सुरू कराल, तेव्हा लेकरे त्या वस्तु दुस-या आपल्या उजीवकडील लेकराकडे देतील, वस्तु आपल्या हातात जास्त वेळ राहाणार नाही हे लक्षात ठेवतील. जेव्हा संगित थांबेल तेव्हा ज्या लेकरांच्या हातात वस्तु असतील ते खेळातून बाद होतील. लवकर लवकर खेळा, जोवर 1 विजेता ठरत नाही.

### *कुकी चेहरा*



अनेक लेकरांना मोकळया जागी खेळण्यासाठी निवडा आणि प्रत्येकाला कुकी द्या. सर्वांनी कुकी आपल्या डोक्यावर ठेवल्यावर खेळाला सुरूवात होईल. खेळाला सुरूवात झाल्यावर खेळाडू आपल्या चेह-यावरील स्नायुंचा उपयोग करून कुकी आपल्या तोंडामध्ये टाकण्याचा प्रयत्न करील. जर कुकी पडली तर खेळाडू खेळातून बाद होईल. प्रत्येकाला एका कुकीसाठी एक मिनीट देण्यात येईल. जो कोणी 2 मिनीटामध्ये 2 कुकी तोंडामध्ये टाकेल तो विजेता ठरेल.

# 4. शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते

## एस्तेर 3-9 तिच्या लोकांचे तारण

### लक्ष वेधक / टाळया 4

"शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते."

1. जोडीदारासोबत, उजव्या पंजाने एकत्र टाळी वाजवा, नंतर हात मागे करून टाळी वाजवा, मग पुन्हा हात समोर करून टाळी वाजवा
2. मुठ तयार करा, ती वर एकमेकांना भिडवा, खाली भिडवा, मग पुन्हा वर भिडवा
3. आकाशाकडे बोट दाखवा आणि खांदे हलवा आणि कोपर खाली तीनदा हलवा

### पाठांतर वचन 4

1 योहानाचे 3:16 "ख्रिस्ताने आपल्याकरता स्वतःचा प्राण अर्पण केला ह्यावरून आपल्याला देवाच्या प्रीतीची जाणीव झाली आहे; तेव्हा आपणही आपल्या बंधूकरता स्वतःचा प्राण अर्पण केला पाहिजे."

### नाटक 4: उंट सौंदर्य स्पर्धा

कॅमेलीया: उ....मी खूपच काळजीत आहे!

कॅमेलॉट: तू का काळजीत आहेस, कॅमेलीया? मला खात्री आहे कि तू ठीक करशील.

कॅमेलीया: ही सौंदर्य स्पर्धा काहीहि केले तरी मी जिंकणार नाही! नृत्य स्पर्धा वेगळी गोष्ट होती, परंतु ही सौंदर्य स्पर्धा फारच वेगळी आहे. ओह, जर मला एवढे मोठे नाक आणि एवढे मोठे पाय नसते तर बरे झाले असते! घरी सर्व मुली माझे नाक आणि पाया दुस-यांपेक्षा मोठे आहे म्हणून मला हसत असत, फार काय मुले सुध्दा मला हसत असत! मी काय करणार, मी काय करणार?

कॅमेलॉट: जगावर मोठा ठसा उमटविणार? काय मुष्टीयुध्द जिंकणार?

कॅमेलीया: हे! मला खरोखर जिंकायला पाहिजे कारण माझे मालक विजयी रक्कम दानधर्मासाठी देणार आहे. हे महत्वाचे आहे!

कॅमेलॉट: तुला हे माहित नाही का की तू अंतर्यामी कशी आहेस हे तू बाहेर कशी आहेस यापेक्षा जास्त महत्वाचे आहे?

कॅमेलीया: खरंच? पण मग माझ्या नाकाबद्दल काय??

कॅमेलॉट: आपल्या नाकाचा विचार करू नको. तू येथे सर्वात्तम उंट होण्यासाठी आणि इतरांप्रती दयाळू होण्यासाठी आली आहेस, यासाठी की त्यांना देवाची ओळख व्हावी! दयाळू आणि विचारशील असण्याकडे लक्ष केंद्रित कर.

कॅमेलीया: परंतु माझ्या स्वरूपाचे काय?

कॅमेलॉट: इकडे ये, मी तुझ्या चेह-यावर काही सौंदर्य प्रसाधने लावतो (काही पावडर हवेत फेका, लेकरांना दिसेल एवढा. कॅमेलीया आणि कॅमेलॉट दोघेहि खोकलतात आणि शिंका देतात). कदाचित तो पावडर नको. बोटॅक्स इंजेक्शन दिले तर कसे होईल?

कॅमेलीया: नाही. ते फसविणे होईल आणि त्यामुळे मला अपात्र ठरविण्यात येईल!

कॅमेलॉट: इकडे ये. मी तुझ्या डोळयाला काजळ पेन्सिल लावतो... (कॅमेलॉट ओबडधोबडपणे कॅमेलीयाकडे जातो, काजळ पेन्सिल आपल्या तोंडात ठेवतो...) हालू नको.

कॅमेलीया: आक! त्याची गरज नाही. मला उत्तेजन दिल्याबद्दल आभारी आहे, बरं का. मला वाटते देवाने मला जसे केले आहे तशीच मी सौंदर्य स्पर्धेमध्ये सहभागी होईल आणि तू सांगितल्याप्रमाणे दुस-यांसाठी दयाळू आणि विचारशील राहण्याकडे मी लक्ष पुरविन. ओह, आता माझी पाळी आहे. कॅमेलीया मंच सोडते.

कॅमेलॉट: मला सांग जेवण कुठे आहे, कारण जेवणाचा दुरून वास येत आहे! हीही! मला भूक लागली आहे.

उद्‌घोषक: आणि 19.7 गूण मिळवून विजेती आहे....कॅमेलीया! आपल्या अपूर्व नाकासाठी आणि पायासाठी प्रसिध्द असलेली, ज्या दोन्ही गोष्टी उंट सौंदर्य स्पर्धेसाठी महत्वाच्या आहेत.

## मुख्य धडा 4

पुन्हा स्वागत आहे! आज आपण शौर्याबाबत आणखी काहीतरी शिकणार आहोत. मेदी आणि पारशी लोकांनी बाबेलचे राज्य पादाक्रांत केले होते. काही काळानंतर, अहेश्वेरोश राजाने एक मोठी मेजवाणी दिली. मोठया मेजवाणीमध्ये, वश्ती राणीने आज्ञा मोडली. राजाने तिला पदावरून काढले आणि तिच्या जागी दुस-या स्त्रीची निवड केली. तरूण यहूदी मुलगी जिचे नाव एस्तेर होते, सुंदर होती आणि तिचा स्वभाव शांत आणि सौम्य होता, जो आजूबाजूच्या सर्वांना सुंदर वाटत होता आणि राजाने तिला राणी केले. आपल्या आधीच्या धडयातील मित्रांची आठवण आहे ना? त्यांना देवाच्या गौरवासाठी आणि इतरांच्या लाभासाठी वरचे पद देण्यात आले होते. ही गोष्ट वेगळी आहे, एस्तेरचे सौंदर्य आणि तिचे स्थान इतरांच्या लाभासाठी होते. सर्वजण म्हणतील, “शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते!”

हामान नावाच्या दुष्ट मनुष्याच्या मनामध्ये यहूदी लोकांना मारून टाकावे असे आले होते. त्याने राजाला पटवून दिले की ठराविक दिवशी असा हुकूम काढण्यात यावा की प्रत्येक जण यहूदी लोकांना मारून टाकू शकतो. सर्वजण दुःखी झाले! एस्तेरचा काका, मर्दखय, ज्याने तिचे पालनपोषण केले होते, त्याने एस्तेरला याबाबत सांगितले आणि मध्यस्ती करण्याची विनंती केली. ते भितीदायक होते, कारण राजाने बोलविल्याशिवाय जर कोणी राजासमोर गेले तर त्याला देहांत शासन केले जात असे! मर्दखायाने तिला आठवण करून दिली की कदाचित तिने आपल्या लोकांचे प्राण वाचवावे म्हणून तिला राणीपद मिळाले असेल. इतरांनी आपला अनंतकाळ स्वर्गात घालवावा म्हणून तुम्ही त्यांना येशूची सुवार्ता सांगितली तर तुम्ही निर्भय होऊ शकता, ज्याला टोमणे मारण्यात येत आहे त्याच्या बाजूने उभे राहून, वाईट करण्यापेक्षा येशूला अनुसरण्यासाठी इतरांना उत्तेजन देवून, सत्य सांगितल्याने कोणी दुखावले जात असेल तरी सत्य सांगून, किंवा जो कोणी एकटा आहे त्याच्यासाठी काहीतरी चांगले करून आणि जरी लोक तुमच्याबाबत वाईट बोलत असतील तरी. सर्वजण म्हणतील, “शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते!”

एस्तेरने मर्दखयाला आणि शहरातील यहूदी लोकांना तिच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगितले. जेव्हा तुम्ही पाहाता की काहीतरी करण्याची गरज आहे, जे घाबरून टाकणारे आहे, तेव्हा देवाकडे धैर्यासाठी आणि मदतीसाठी प्रार्थना करा! नंतर एस्तेरने अद्‌भूत अशी गोष्ट केली आणि ती राजासमोर जावून उभी राहीली. तिला खूप हायसे वाटले की राजाने आपला राजदंड तिच्यासमोर केला आणि तिचा जीव वाचविला आणि तिला विचारले की तिची मागणी काय आहे. तिने राजाला मेजवाणीसाठी आमंत्रण दिले, नंतर मेजवाणीच्या वेळी तिने राजाला आणखी एका मेजवाणीला बोलाविले. कदाचित त्या क्षणी तिला हामानाबाबत सांगण्यासाठी भिती वाटली असेल, किंवा तिने आधीच तसे नियोजन केले असेल. आपल्याला माहित नाही. परंतु शौर्य परिपूर्ण असलेच पाहिजे असे काही नाही. तुम्हाला कधीकधी कोणत्या गोष्टीची एवढी भिती वाटते

की तुम्हाला वांती होते? ठीक आहे! नहाणीत जा आणि वांती करा, आणि मग पुन्हा या आणि काहीहि असो इतरांसाठी चांगले करा. जेवढी जास्त तुम्हाला भिती वाटेल, तेव्हा तितके जास्त तुम्ही शूर असता जेव्हा तुम्ही इतरांसाठी चांगले करता. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते!’’

राजाने एस्तेरचे ऐकले आणि जो फाशीचा खांब हामानाने मर्दखयाला फाशी देण्यासाठी उभारला होता त्याच खांबावर हामानाला फाशी दिली. राजाने यहूदी लोकांना आपले सरंक्षण करण्याची परवानगी सुष्दा दिली. हामानाच्या मनात दुष्टाई होती तरी, यहूदी लोकांकडे पूर्ण राज्यभर मोका होता. मग राजाने मर्दखयाला संपूर्ण साम्राज्यात त्याच्या खालोखाल अधिकारी केले, जेथे त्याने यहूदी लोकांच्या भल्यासाठी काम केले. जेव्हा तुम्ही काहीतरी शुरपणाची गोष्ट कराल तेव्हा गोष्टी कदाचित अशाच होतील असे नाही. तुम्हाला जसे वाटते तसे कदाचित घडणार नाही. परंतु जेव्हा तुम्ही धैर्याने इतरांना तुमच्या आधी ठेवता आणि प्रेमाने देवासाठी उभे राहाता, पूर्ण विश्वाचा योग्य राजा येशू, तुमच्या जीवनामध्ये उंचावला जाईल. तो तुमच्यामध्ये कार्य करीत आहे हे सर्वांना दिसून येईल आणि एके दिवशी ते सर्वजण तुमच्या सत्कृत्यांसाठी देवाची स्तुती करतील आणि तुम्हाला सर्वसमर्थ देवाकडून वाहवा मिळेल. सर्वजण म्हणतील, ‘‘शौर्य स्वतःच्या आधी इतरांना ठेवते!’’

# परिभ्रमण स्थानकं

## सामाज्यात हस्तकृती 4

### ***फोटोची चौकट***




***साहित्य***

*फेसाळ किंवा रंगीत कागदावरील चित्र चौकट

*3 कागदी मुगूट

*शब्द "मी धैर्यवान आहे."

*पिण्याची 1/2 नळकाडी

* पिरगळलेली रिबन

* डिंक

***सूचना***

* चौकटीचा नमूना कापा आणि जास्तीचे तुकडे काढून टाका.


*अर्धी घडी करा आणि 3 किंवा 4 काठ तयार करा. 4 था काठ चित्र टाकण्यासाठी उघडा ठेवा आणि नळकांडी टाकण्यासाठी पटटी ठेवा.

*फोटो छापण्याचा किंवा लेकरांना एस्तेरचे चित्र काढून ते चौकटीमध्ये टाकण्यास सांगा.

*मुगूटाला आणि "मी शुर आहे" हे शब्द लावून सजवा.


*ते संपविण्यासाठी, नळकांडी पट्टीमध्ये टाका आणि चित्र चौकट लटकवण्यासाठी पिरगळलेली रिबन नळकांडीच्या दोन्ही बाजूला बांधा.

## राजवाडयामध्ये वर्ग 4










| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ए | मे | ए | स्ते | र | रा | ए | शौ | आ | रा |
| मे | घा | रा | आ | ए | फा | मे | हा | सां | र्य | ए |
| द | वा | पा | र | सी | शी | व | वा | मा | रा | मे |
| य | च | सां | आ | घा | आ | सां | श्ती | ए | न | आ |
| घा | वि | म | गि | मे | ज | वा | णी | मे | आ | ज्ञा |
| ए | णे | र्द | चु | त | सां | चु | घा | रा | ब | मो |
| रा | मे | ख | घा | चु | ले | वा | ल | ए | चा | ड |
| दी | ए | य | रा | आ | ए | सां | रा | ता | व | ली |
| हू | आ | ए | घा | ब | र | ले | मे | ए | चु | रा |
| य | रा | जा | अ | ह | श्वे | रो | श | सां | रा | णी |

73





## प्रश्न आणि उत्तरे 4

1. **आजच्या पवित्र शास्त्रातील गोष्टीतील लोकांची नावे काय आहेत?**
   अहेश्वेरोश राजा, वश्ती राणी, एस्तेर, हामान आणि मर्दखय
2. **तुम्हाला कशाची भिती वाटते?**
   संभाव्य उत्तरे: अंधार, कोळी, साप, कुत्रे, हत्यार, अपरिचीत लोक, मोठा आवाज, लोकप्रियता गमावणे, दादागिरी करणारे लोक, घर किंवा शाळा बदलणे.
3. **एस्तेरने शुरपणाची कोणती गोष्ट केली?**
   तिने राणी होण्यासाठी अर्ज केला, बोलावणे आले नव्हते तरी राजासमोर जाऊन तिने आपला जीव धोक्यात घातला, तिने राजाला मेजवाणीचे आमंत्रण दिले, तिने त्याला सर्व यहुदी लोकांचा संहार करण्याच्या हामानाच्या योजनेबाबत सांगितले.
4. **शौर्याच्या कोणत्या गोष्टी तुम्ही करू शकता?**
   तुमच्या देवावरील विश्वासाबाबत इतरांना सांगा, शाळेतील दादागिरी करणा-यांना विरोध करा, तुमच्या आईवडीलांसोबत प्रामाणिक असा.
5. **राजाने हामानाने सांगितलेला आपला हुकूम का बदलला नाही: असा नेमलेला दिवस ज्या दिवशी यहूदी लोकांना मारून टाकण्यात येईल?**
   बाबेल परगणा मेदी आणि पारशी लोकांनी पादाक्रांत केला होता आणि त्यांचे कायदे आणि नियम न बदलणारे होते.

## नेमून दिलेले काम 4

शुरपणाचा सराव करा आणि तुम्ही ख्रिस्ती आहात हे इतरांना सांगा.

शिक्षक: आज दुसरे कोणीतरी आपल्या भेटीला येत आहे. सर्वांनी एस्तेर राणीचे स्वागत करावे!

एस्तेर: नमस्कार सर्वांना. तुम्हा सर्वांसोबत उपस्थित आहे म्हणून आनंद वाटतो.

शिक्षक: आज आम्ही तुझी गोष्ट शिकत आहोत. तू राणी कशी झालीस हे आम्हाला सांगशील का?

एस्तेर: मी माझे काका मर्दखय, ज्यांनी माझे पालनपोषण केले, त्यांच्यासोबत राहात होते, जेव्हा अहश्वेरोश राजाने वश्ती राणीला, तिने सर्व सरदारांसमोर त्याचा अपमान केला म्हणून, राणीपदावरून काढून टाकले. कोण राणी बनेल हे पाहण्यासाठी सर्व मुलींना एकप्रकारे सौंदर्य स्पर्धेसाठी बोलविण्यात आले. मला मर्दखयाला सोडण्याची भिती वाटत होती, पण त्याने मला उत्तेजन दिले. आम्ही तयारी करण्यामध्ये आणि सौंदर्य उपचारामध्ये पूर्ण वर्ष घालविले. काही मुली कठोर होत्या, काही गोड होत्या, आणि पुष्कळ सा-या मजपेक्षा सुंदर होत्या. परंतु आमच्यावरील कारभाऱ्याकडून मला अनुग्रह मिळाला आणि राजासमोर जाण्याचा माझा क्रम येईपर्यंत मी त्याच्या सूचनाचे पालन केले. मला माहित नाही राजाने माझी निवड का केली, परंतु अचानक मी राज्याची राणी झाले.

शिक्षक: बापरे, स्वप्न साकारच झाले जणू काय! राणीचे जीवन कसे असते?

एस्तेर: मी राजाची सेवा करते आणि नेहमी मेजवाणी आणि कार्यक्रमामध्ये सहभागी होते आणि राज्यातून अधिका-यांच्या ज्या बायका महालात येतात त्यांची देखभाल करते.

शिक्षक: हामानाबाबत काय झाले?

एस्तेर: त्याने राजाला हुकूम काढण्यास सांगितले ज्याकडून सर्वांना परवानगी होती की ठराविक दिवशी यहूदी लोकांना मारून टाकावे. मला माझ्या लोकांबाबत भिती वाटत होती, परंतु राजवाडयातील कोणालाच मी यहूदी आहे हे माहित नव्हते कारण मी तसे सांगितले नव्हते. मग सर्वकाही फारच वाईट झाले. हामानाने त्याच्या घरी भला मोठा खांब उभारून त्यावर माझे काका मर्दखय यांना फाशी देऊन मारून टाकण्याची योजना आखली. परंतु ज्या रात्री तो राजाची परवानगी घेण्यासाठी राजाकडे गेला, राजा वृतांत ऐकत होता आणि त्याला आठवण झाली की माझ्या काकांनी काही काळापूर्वी त्याचा प्राण कसा वाचविला होता. हामानाने मर्दखयाला मारून टाकण्याऐवजी राजाने हामानाला मर्दखयाला पूर्ण राज्यभर घोडयावर बसून, राजेशाही पेहराव घालून फिरविण्यास लावले आणि राजा ज्याचा सन्मान करतो त्याचा असा सन्मान होतो असे सांगण्यास लावले.

शिक्षक: याकडून तुझ्या लोकांचा हुकूमापासून बचाव झाला का?

एस्तेर: नाही, कारण मेदी आणि पारशी यांचा शिरस्ता बदलत नसतो. त्या काढलेल्या हुकूमामुळे आम्ही अजूनहि संकटात होतो.

शिक्षक: तू काय केले?


एस्तेर: मर्दखयाने मला पुन्हा उत्तेजन दिले आणि मदतीसाठी राजाकडे जाण्यास सांगितले. ते भितीदायक होते. जरी मी राणी आहे, तरी राजाने बोलविल्याशिवाय त्याला भेटण्यास मला परवानगी नव्हती आणि तसे केले तर मला देहांत शिक्षा झाली असती. परंतु मर्दखयाने मला सांगितले की देवाने याच कारणासाठी मला राणी केले असेल आणि मला सांगितले की मी धैर्यवान व्हावे. सर्व यहूदी काही दिवस माझ्यासाठी प्रार्थना करीत होते आणि उपास करीत होते मग मी पेहराव केला आणि राजाकडे गेले. मी थरथर कापत होते आणि ते राजाला दिसू नये असा माझा प्रयत्न होता. राजा हसला आणि माझा जीव वाचविण्यासाठी त्याने आपला राजदंड मजकडे केला आणि उभे राहाणे मजसाठी कठीण होते. मग मी राजाला आणि हामानाला मेजवाणीचे आमंत्रण दिले, आणि मग दुस-या मेजवाणीस बोलावले. सरतेशेवटी एक जलद प्रार्थना केल्यावर, मी राजाला हुकूमाबाबत आणि माझ्या लोकांबाबत सांगितले. हामान राजा खालोखाल अधिकारी होता आणि मला भिती वाटत होती की कदाचित राजा माझ्यापेक्षा आणि माझ्या लोकांऐवजी हामानाची निवड करील. परंतु राजा क्रोधाविष्ट झाला आणि त्याने हामानाला जो फाशीचा खांब त्याने मर्दखयासाठी तयार केला होता, त्यावरच मारण्यास सांगितले. मग राजाने मर्दखयाला हामानाची जागा घेण्यासाठी बढती दिली आणि आम्ही राजाच्या वतीने दुसरी द्वाही लिहीली की लोकांना मरण्याऐवजी आपले सरंक्षण करण्याची परवानगी राहील.

शिक्षक: एस्तेर, येथे आल्याबद्दल आभारी आहे.

एस्तेर: मला बोलावले म्हणून मी आभार मानते.

## कार्यानूभव 4


### ***इतरांना आपल्या समोर ठेवणे***



लोकांनी इतरांना आपल्या समोर कसे ठेवावे हे समजावे म्हणून, गटाला एक कागदी चेंडू तयार करण्यास सांगा आणि तो सगळयांकडे फेकण्यास सांगा. जेव्हा एखाद्याकडे चेंडू असतो तेव्हा इतरांना समोर कसे ठेवावे हे ते सांगतील. उदाहरणार्थ, मी माझ्या वर्गातील मुलाला माझ्यापेक्षा समोर ठेवण्यासाठी, त्याला माझ्या आधी वर्गामध्ये जावू देईल.

## शाही मेजवानी 4

### ***राणीचे मोठे मन***



***घटक:***

- हृदयाच्या आकाराचा मिठाई कापणारा साचा किंवा पुठ्ठा आणि सुरी
- फळाचे कापलेले तुकडे
- काडया (दातकोरण्या)

***सूचना :***

1. कुकी कटरने फळाचे हृदयाच्या आकाराचे तुकडे करा. जर तुमच्याकडे हृदयाच्या आकाराचा कटर नसेल, तर पुठ्टयाचे किंवा खोक्याचे हृदय बनवा. पुठ्ठयाचे हृदय फळांवर ठेवा आणि सुरीने फळ कापा.

2. हृदयाच्या आकाराचे फळाचे तुकडे काडयांवर ठेवा.

***आता हे हृदयाच्या आकाराचे तुकडे खा आणि एस्तेर राणीला दुस-यांसाठी जे मोठे मन होते त्याची आठवण करा!***




## बागेतील खेळ 4

### *बिंगो लिंगो*



वर्गाच्या मदतीने, धडयातील 50 किंवा 60 शब्दांची यादी तयार करा. आता या धडयातील म्हणजे एस्तेरच्या गोष्टीतील शब्दांची यादी करा. सहज दिसेल अशा जागेवर ती यादी लावा. लहान कागदावर प्रत्येक शब्द लिहा, त्याची अर्धी घडी करा आणि त्या चिठया कॅनमध्ये किंवा कोणत्याहि डब्यात ठेवा. लेकरे आपले स्वतःचे बिंगो कार्ड तयार करतील, कागद प्रत्येक बाजूने 2 दा अर्धी घडी करतील आणि अशाप्रकारे आपल्या कागदावर 16 चौकोन तयार करतील. प्रत्येक चौकोनामध्ये ते शब्द लिहीतील. कडधान्य, दगड इत्यादींचा खुणा म्हणून वापर करता येईल. ते कार्ड बरेचदा वापरू शकतील किंवा जोडीदार बदलू शकतील. शिक्षक कॅनमधून शब्द काढतील आणि तो शब्द मोठयाने उच्चारतील. जर लेकराकडच्या कार्डवर तो शब्द असेल, तर तो शब्द तो मार्करने झाकेल. ज्याचे कार्ड प्रथम भरेल तो ओरडेल, ''बिंगो लिंगो'' आणि तो विजेता होईल.

### *उंट शर्यत*



10-15 लेकरांची, सारखी संख्या असलेल्या, चमू तयार करा. ते ओळीत उभे राहातील, खेळण्यासाठी पुरेशी जागा ठेवतील. खोलीच्या दुस-या बाजूला गोल तयार करा. खेळण्यासाठी, ओळीतील पहिला खेळाडू धावेल आणि गोलामध्ये उंटासारखा आवाज काढेल, वळेल, आणि आपल्या चमूकडे पुन्हा येईल. जेव्हा तो दुस-या खेळाडूला हातावर थापटतो, तेव्हा दुसरा खेळाडू रिले रेसमध्ये भाग घेतो. जी चमू सर्वात प्रथम रिले रेस संपवेल ती विजयी होईल. पळण्याची पध्दत बदलवा आणि पुन्हा खेळा: एका पायावर पळा, अंतिम रेघेकडे वळा इत्यादी.

### लक्ष वेधक / टाळया 5

“शौर्य टिकून राहते”

1. एका सहकार्या बरोबर दोन्ही हातांनी टाळी वाजवा
2. हात आडवे करून पुन्हा टाळी वाजवा
3. पहिली टाळी पुन्हा वाजवा
4. उजव्या हाताची एकत्र टाळी वाजवा, मग डाव्याची आणि मग उजव्याची
5. शेवटी दोन्ही हातांची अंतिम टाळी वाजवून समाप्त करा.

### पाठांतर वचन 5

इब्री लोकांस पत्र 10:36 “तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे वागून वचनानुसार फलप्राप्ती करून घ्यावी, म्हणून तुम्हांला सहनशक्तीचे अगत्य आहे.”

### नाटक 5: उंटांचा तांडा

कॅमेलीया: ओहो, वाळवंटातील हा सूर्य खरंच माझया सुंदर त्वचेला खराब करणार आहे!

कॅमेलॉट: चांगली गोष्ट आहे की तू कोट घातला आहेस.

कॅमेलीया: मला माहित आहे, ह्या सर्व लोकरीने फार गरम होते. आपण इथे आहोत तरी कशाला? मला परशीयाला परत जायचे आहे. ह्या तांडयामध्ये आपल्याला किती वेळ चालायचे आहे?

कॅमेलॉट: दिवस भर. आणि मग उद्या आपल्याला काय करायला मिळणार आहे माहित आहे?

कॅमेलीया: चालणे?

कॅमेलॉट: बरोबर! आणि त्या नंतरच्या दिवशी, ओळख काय?

कॅमेलीया: आपण चालत राहू?

कॅमेलॉट: होय! तुला कसे माहीत?

कॅमेलीया: आहा! दररोज सकाळी आपण उठतो आणि तेच ते खातो, मग प्रार्थना करतो आणि मग चालतो आणि चालतो मग आपण दुपारच्या जेवणासाठी थांबतो आणि पुन्हा तेच खातो आणि प्रार्थना करतो, मग आपण चालतो आणि चालतो, मग रात्री आपण पुन्हा तेच खातो आणि प्रार्थना करतो आणि झोपतो. तीच ती गोष्ट करून मी थकून गेली आहे! मी रात्री स्वप्नात सुध्दा चालणे पाहते! आणि तुला माहित काय, मला तहान लागली आहे! असे कधीच होत नाही! मी आता थांबू शकते काय?

कॅमेलॉट: काय, इथं थांबायच? पाहू.....तिथे पाणी नाही. आणि पाहा! तिथेही पाणी नाही. थांब तिकडे काय आहे? पाणी नाही. थांबण्यासाठी ही भयंकर जागा आहे.

कॅमेलीया: उग.... किंवा आपण थांबतो तेव्हा प्रत्येक वेळेस प्रार्थना तरी करू नये? हे कंटाळवाणं होत आहे. शिवाय आपल्या तांडयातील ब-याच लोकांनी प्रार्थना करणे थांबवीले आहे आणि त्यांना वाटते आपण प्रार्थना करणे सुरू ठेवले हे विचित्र

आहे. आणि शिवाय ह्यात मोठी गोष्ट काय आहे?

कॅमेलॉट: ते मनोरंजनासाठी नाही. आपल्याला सर्व वेळेस देवाची गरज आहे!

कॅमेलीया: पाण्यापेक्षा अधिक?

कॅमेलॉट: होय! सनस्क्रीन पेक्षाही अधिक. किंवा मोबाइल पेक्षाही अधिक.

कॅमेलीया: बरं, मी लवकरच पडणार आहे आणि तू मला तिथे घेऊन जाशील.

कॅमेलॉट: हे! मलाही तहान लागली आहे. चालत राह एका वेळेस एक पाऊल.

उद्घोषक: काही वेळेनंतर ते एका हिरवळ प्रदेशात पोहचले.

कॅमेलीया: फू! मला वाटले की मी मरणार आहे!

कॅमेलॉट: (चावत) आपण सर्वच मरणार होतो!!! (त्याचे नाक मंचा खाली खाण्यासाठी टाकतो)

कॅमेलीया: हे, तू त्या इतर उंटांना बोलतांना ऐकले?

कॅमेलॉट: ज्यावर वेगवेगळया राज्याच्या परवांगी पाटया आहेत ते?

कॅमेलीया: होय. ते आपल्या आधी पोहचले आणि ते सर्व प्रकारचे साप आणि डाकू आणि वाळूच्या वादळाविषयी बोलत होते.....

कॅमेलॉट: आणि शिंका आणि लागलेली पायांची बोटं आणि.. (फडफड) आणि वायफाय नाही! (खाणे सुरू ठेवतो)

कॅमेलीया: मला वाटते की देवाने पूर्ण वेळ आपले संरक्षण केल. हे तुला माहित काय? मला इथे हिरवळ प्रदेशात जेवण आणि पाण्यासह बरं वाटत आहे..... देवाबरोबर बोलणे इथं बरेच सोपे आहे. कठिण वेळ असतांना हे टिकून राहणे आणि देवाबरोबर वेळ घालविण्याने आता ते सोपे असतांना अधिक चांगले झाले आहे.

कॅमेलॉट: होय, माझेही तसेच आहे. हे, तू ते खाणार आहेस काय? मला भूक लागली आहे.

## मुख्य धडा 5

ह्या व्हीबीएस मध्ये पुन्हा स्वागत आहे! ह्या आठवडयात आपण शौर्याबद्दल सर्व प्रकारच्या गोष्टी शिकलो. आज आपण शिकणार आहोत की शौर्य टिकून राहते. सर्वांनी म्हणा, “शौर्य टिकून राहते!” टिकून राहणे म्हणजे ज्या चांगल्या गोष्टी तुम्ही करत आहात त्या करत राहणे. तुम्ही काल काय केले हे महत्वाचे नाही. जर तुम्ही येशूला अनुसरण्याबद्दल चांगले केले तर अभिनंदन! परंतू कालवर भरवसा ठेवू नका, आज पुन्हा चांगले करा. जर तुम्ही येशूला अनुसरण्याविषयी चांगले केले नाही तर, काळजी करू नका कारण त्याने तुमच्या पापांची पूर्ण खंडणी केली आहे. परंतू जी चूक तुम्ही काल केली तिला तुम्हाला आज चांगले करण्यापासून मागे ठेवू देऊ नका. सर्वांना म्हणा, “शौर्य टिकून राहते!”

शौर्य केवळ देवाला प्रथम स्थान देत नाही परंतू टिकून राहते आणि दररोज देवाला प्रथम स्थान देते. देवावर केवळ एकदा भरवसा ठेवू नका तर दररोज ठेवा. केवळ एकदा सत्य बोलू नका तर नेहमी बोला. आणि इतरांना तुमच्या वर केवळ एकदा ठेवू नका तर दररोज तसे करा. येशूने आपल्याला सांगितले की आपले जीवन त्याच्या साठी दररोज दयावे, त्याला शरण जावे आणि जर आपली इच्छा नसली तरी चांगल्या गोष्टी करत राहाव्या. दानीएल ज्याच्या बद्दल आपण पहिल्या दिवशी शिकलो, तो दिवसातून तीनदा न चुकता प्रार्थना करीत असे. त्याच वेळेस तो इतका चांगला प्रशासक होता की दार्यावेश राजाने त्याला सर्व राज्याचा कार्यभारी नेमले होते. ह्या मूळे इतरांना इतका हेवा वाटला की त्याने प्रार्थनेवर बंदी घालून दानीएलाला पकडण्यासाठी फर्मान काढण्यासाठी दार्यावेश राजाला फसविले. सर्वांनी म्हणावे, “शौर्य टिकून राहते!”

ह्या फर्मानाला घाबरण्या ऐवजी, दानीएल नेहमी सारखा दिवसातून तीनदा त्याच्या खोलीत देवाचे आभार मानण्यासाठी जात राहीला. जेव्हा तुम्ही हे ओळखता की देव राजा आणि कायदे हयांच्या सारखाच सर्वसमर्थ आणि मोठा आहे तेव्हा तुम्ही हे ओळखू शकता की प्रत्येक चांगली गोष्ट देवा कडून येते आणि कठिण प्रसंगी सुध्दा देवाचे आभार मानू शकता. एका दिवशी दानीएल प्रार्थना करीत होता आणि देवाकडून मदत मागत होता. त्याच वेळेस त्याच्या शत्रूंनी त्याला पकडले आणि त्याच्या बेकायदेशीर प्रार्थनेसाठी त्याला आत टाकले. जेव्हा समस्या आली तेव्हाच तो देवाकडे मदत मागत होता! दार्यावेश राजा सुध्दा नाराज झाला आणि दानीएलाला सोडविण्यासाठी त्याने सर्व प्रयत्न केले, परंतू काहीच करता आले नाही. बरेचदा आपल्या जीवनात आणि आजूबाजूला पाहतो आणि आपल्या समस्येतून बाहेर येण्याचा मार्ग आपल्याला सापडत नाही. दुस-या दिवसाचा धडा आठवतो काय? तरीही देवावर भरवसा ठेवा, कारण देव अमार्याद असा सुज्ञ आणि सृजनशील आहे आणि जेव्हा कोणीच मार्ग काढू शकत नाही तेव्हा तो मार्ग काढू शकतो. सर्वांनी म्हणावे, “शौर्य टिकून राहते!”

दानीएलाला सिंहाच्या गुहेत टाकण्यात आले आणि तो तिथे रात्र भर राहिला. किती भिती दायक! तुम्ही जवळून सिंह पाहिला आहे काय? त्याची लहानशी डरकाळी जमीन हादरविते. पंरतू देवाने सिंहाचे तोंड बंद करण्यासाठी देवदूताला पाठवून, सिंहाच्या गुहेच्या आत दानीएलाला सोडविले. दानीएलाने सिंहासोबत ती रात्र अशी घालविली जणू ते खेळण्याचे प्राणी आहेत. सकाळी दार्यावेश राजा आला आणि त्याने दानीएलाला सुरक्षीत पाहिले. त्याने दानीएलाच्या शत्रूंना गुहेत फेकले आणि ते जमीनीवर पडण्याच्या आधी सिंहांनी त्यांना मारून टाकले. आणि दार्यावेश राजाने सर्व राज्यातील लोकांना सांगितले की दानीएलाच्या देवाचे भय धरावे आणि दानीएलाला राज्या मध्ये मोठया पदावर उन्नत करण्यात आले. सर्वांनी म्हणावे, “शौर्य टिकून राहते!”

देव कोण आहे, आणि त्याला सर्व अधिकार आहे आणि तो सर्व समर्थ आहे हे जाणणे आपल्याला कठिण गोष्टी करण्यासाठी शौर्य देते, जसे की कठिण असतांना सुध्दा देवावर भरवसा ठेवणे आणि त्याची आज्ञा पाळणे, तसेच इतरांवर प्रीती करणे. देव कोण आहे हे अधिकाधिक समजण्यासाठी आपण दानीएलासारखं दररोज त्याच्या बरोबर वेळ घालविला पाहिजे. पवित्र शास्त्र वाचा, प्रार्थना करा, त्याच्या साठी गीत गा, तुम्ही एकटे असले तरी. जस जसे तुम्ही हे करता तुम्ही हे शिकाल की देव किती महान आहे आणि तुम्ही त्याच्यासाठी अधिक धैर्यवान व्हाल. सर्वांनी म्हणावे, “शौर्य टिकून राहते!”

## साम्राज्यात हस्तकृती 5

### *सिंहाचा मुखवटा*



***साहित्य***

* कागदी मुखवटयाचा बेस
* चेहरा असलेला पिवळा फोम किंवा रंगीत कागद
* कान, भुवया आणि नाकासाठी नारंगी फोम किंवा रंगीत कागद
* तोंडासाठी पांढरा फोमी किंवा कागद
* 50 सेमी कुरळी रिबीन
* रंग
* डिंक

***सूचना***

*मुखवटयाचा बेस कापा व त्याला रंग द्या.
* फोटो मध्ये दाखविल्या प्रमाणे पिवळा फोम/कागद त्यावर चिटकवा.
* त्यावर तोंड चिटकवा आणि त्यावर नाक चिटकवा. तसेच फोटो मध्ये दाखविल्या प्रमाणे कान आणि भुवया चिटकवा.
* दोन्ही कडेवर कुरळी रिबीन लावा जेणेकरून ते मुलांच्या डोक्यावर नीट बसेल.

## राजवाडयामध्ये वर्ग 5









| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बे | बे | रा | हे | फ | गी | फ | दे | प्रा | टि |
| ने | का | द | दा | वा | त | र | प | र्थ | क |
| दे | बे | य | तों | रा | गा | मा | वि | ना | णा |
| रा | व | ने | दे | ड | णे | न | त्र | क | रे |
| जा | रा | द् | बे | शी | भि | टि | शा | र | दा |
| दा | दे | भि | त | भ | र | वा | स्त्र | णे | टि |
| र | द | भि | ती | दा | य | क | भ | फ | दा |
| या | रा | द | फ | टि | भ | ने | दे | बे | नी |
| वे | सिं | ने | र | गु | दा | द | ह | भि | ए |
| श | टि | ह | दे | रो | हा | फ | ने | मी | ल |
| आ | ज्ञा | पा | ळ | त | ज | वा | च | णे | बे |
| भ | क्ती | द | भ | र | व | सा | ठे | व | त |

| | | |
|---|---|---|
| 4 | 2 | 14 |
| 9 | 15 | 3 |
| 1 | 11 | 8 |
| 10 | 5 | 7 |
| 12 | 13 | 6 |






## प्रश्न आणि उत्तरे 5

1. **धीर धरणे किंवा टिकून राहणे म्हणजे काय?**
   त्याचा अर्थ हा आहे की हार मानू नये तर कठीण असले तरी एखादी गोष्ट करत राहणे. दानीएलाने प्रार्थना करणे सोडले नाही.
2. **जेव्हा सिंह भूकेले होते तेव्हा त्यांनी दानीएलाला खाल्ले का नाही?**
   देवाने त्यांचे तोंडे बंद करण्यासाठी देवदूत पाठविला जेणे करून ते काहीही खाऊ शकणार नाहीत.
3. **हया वेळेस दारयावेश राजाला कसे वाटत असावे: जेव्हा त्याच्या ऐवजी देवाची प्रार्थना करणे बेकायदेशीर ठरवावे हयासाठी त्याला फसविण्यात आले? जेव्हा त्याला भूकेल्या सिंहाबरोबर दानीएलाला टाकावे लागले? जेव्हा दानीएलाला इजा झाली नाही? जेव्हा त्याने निर्णय घेतला की अधिकरा-यांना गुहेत टाकावे?**
   संभाव्य उत्तरे: त्याची प्रार्थना करावी म्हणून गर्विष्ट आणि विशेष, दानीएल मरेल तिथे त्याला टाकण्यासाठी दुखी, आणि दानीएल वाचला हे स्पष्ट होणे, दानीएलाला इजा करण्यासाठी फसविले म्हणून अधिका-यावर रागविणे.
4. **तुमच्या जीवनामध्ये कोणत्या चांगल्या गोष्टी करत राहणे तुम्हाला कठिण वाटते?**
   संभाव्य उत्तरेः प्रार्थना, पवित्र शास्त्र वाचन, देवासाठी गीत गाणे, आईसाठी भांडे घासणे, बहिण भावासोबत दयाळूपणे वागणे, वादाच्या वेळेस इतरांबरोबर विचारशील असणे, तुमचे मन व विचारांची सुरक्षा करणे, ज्या गोष्टी चुकीच्या आहेत हे तुम्हाला माहित आहे त्या "सर्वजण" करत असतांना त्या टाळणे.
5. **राजाने दानीएलाला गुहेतुन बाहेर काढले तेव्हा काय झाले?**
   राजाने लोकांना सांगितले की दानीएलाच्या देवाचे भय धरा. दानीएलाची राज्यातील सर्वात मोठया हुद्यावर पदोन्नती झाली. दानीएलाच्या शत्रूंना सिंहाने खाल्ले.

## नेमून दिलेले काम 5

दानीएलासारखे, आज तीन प्रार्थना करा.

दानीएला बरोबर नाटक 5

शिक्षक: दानीएल तुझे पुन्हा स्वागत आहे.

दानीएल: आभारी आहे. आणखी एक दिवस इथे येऊन आनंद झाला. एस्तेर राणी बरोबर भेट कशी होती?

शिक्षक: एस्तेर राणी बरोबर भेटत असतांना आम्हाला खूप मजा आली. आज आम्ही तू सिंहांबरोबर होता असे काहीतरी ऐकले. ते खरे आहे काय?


दानीएल: होय ते बरोबर आहे. मी एकदा सिंहांबरोबर रात्र घालविली. आता पर्यंत, मी नबुखद्नेस्सर राजा राज्य करत होता तेव्हा काय घडले ह्याच्या गोष्टी तुम्हाला सांगितल्या आहेत. नंतर मेदय आणि पारस आले आणि त्यांनी बाबेल काबीज केले. आणि पुन्हा सत्तेत बदल झाला आणि पुन्हा बंदीवासात जाण्यासारखे वाटले, नवीन संसकृती आणि सत्तेची प्रक्रिया पुन्हा नव्याने शिकणे. परंतू दारयावेश राजाने माझी दखल घेतली आणि मला व आणखी दोन लोकांना वेगवेगळया प्रांताचे अधिकारी असे नेमले. काही काळानंतर त्याने मला संपूर्ण राज्याचा प्रभारी म्हणून नेमण्याचा विचार केला. इतर अधिका-यांना हेवा वाटला आणि मला संपविण्याची त्यांची इच्छा होती. मी जवळून जात असतांना त्यांचे कुजबुजने मला ऐकू येत होते आणि मला माहित होते की ते काहीतरी योजना करीत आहेत. एक दिवस दारयावेश राजाने फार्मान काढले की एक महिना दारयावेश राजा सोडून इतर कोणत्याही देवाची किंवा मनुष्याची प्रार्थना कोणी करणार नाही, आणि त्याची शिक्षा सिंहांच्या गुहेत फेकणे होती. लोक लहान गोष्टीची भक्ति आणि प्रार्थना करण्याचा प्रयत्न करत राहतात. ह्या वेळी ती जीवंत व्यक्ति होती. हे मला विचित्र वाटले, परंतू नविन साम्राज्यात कोणीही फर्मान बदलू शकत नव्हते. माझ्या दररोजच्या नित्यक्रमात मी दररोज देवाची प्रार्थना करणे आणि त्याचे आभार मानण्यात वेळ घालवित होतो. तो माझ्या संपूर्ण जीवनात मला मदत करत होता आणि मला माझे काम चांगले करण्यासाठी त्याच्या मदतीची आवश्यकता होती. एक दिवस मी प्रार्थना करत होतो आणि देवाची मदत मागत होतो जेव्हा अधिका-यांचा एक गट माझ्या खोलीत घुसला आणि त्यांनी देवाची प्रार्थना करतांना मला पकडले. त्यांनी मला दारयावेश राजाकडे आणले. मी काय केले हे त्यांनी त्याला सांगितले तेव्हा त्यानी दु:खी मनाने माझ्या कडे पाहिले. त्या परिस्थितीतून बाहेर यावे अशी माझी खूप इच्छा होती, की नवीन राज्याची सेवा करत राहावी आणि सर्व साम्राज्यातील लोकांच्या भल्यासाठी कार्य करत राहावे.

दारयावेश राजाने मला वाचविण्याचा मार्ग शोधण्यासाठी एक पूर्ण दिवस घालविला. मला कल्पना नव्हती की त्याची माझ्या वर इतकी मर्जी होती. परंतू रात्री हे निश्चित होते की कोणताही मार्ग नाही आणि त्यांनी मला सिंहाच्या गुहेत टाकले. मी ती जागा कधीच विसरणार नाही, त्या मोठया सिंहांचा तो वास आणि उष्णता. त्यांच्या घशातील लहानसा आवाज देखील जमीन हालवून टाकतो. परंतू ते माझ्या वर हल्ला करण्यासाठी, मला खाण्यासाठी किंवा काही खाण्यासाठी माझ्याकडे आलेच नाही. तिथे देवदूत किंवा काहीतरी असावे, जसा माझ्या मित्रांनी भट्टीत अनुभव घेतला. सकाळी मी दारयावेश राजाचा आवाज ऐकला, हे विचारणारा की मी ठिक आहे काय किंवा माझ्या देवाने मला वाचविले काय. मी त्याला देवदूता बद्दल सांगितले आणि त्याला खात्री दिली की मी त्याच्या विरूध्द काहीही केले नाही. त्याने त्या दुस-या माणसांना गुहेत टाकले आणि सिंहानी त्यांना लगेच खाऊन टाकले. मग त्याने एक फर्मान काढले की राज्यातील प्रत्येकाने देवाचे भय धरावे आणि त्याची भक्ति करावी. पहा पुन्हा एकदा देवाने त्याला न ओळखणा-या राजाला त्याचे सामर्थ्य दाखविले. पुन्हा आम्ही पाहिले की बंदिवासात देखील देव आमच्या बरोबर आहे.

शिक्षक: तू प्रार्थनेत कसा टिकून राहिला हे ऐकणे प्रोत्साहनात्मक आहे..

दानीएलः विसरणे सोपे आहे, परंतू सत्य हे आहे की मला देवाची दररोज गरज आहे. तो सर्व वेळी माझी मदत करतो आणि त्यासाठी मी नेहमी त्याचा आभारी आहे.

## कार्यानूभव 5



***माझ्या वेळेत सामावून घेणे***

प्रत्येक मुलाला एक कागद द्या. मुलांना विचार करू द्या की ह्या आठवडयात त्यांच्या कडे कोणता मोकळा वेळ आहे ज्यात ते देवाबरोबर, प्रार्थना करणे किंवा, पवित्र शास्त्र वाचन किंवा त्याची स्तुती करून वेळ घालवू शकतात. त्यांच्या कडे कोणती मोकळी वेळ आहे हे त्यांना कागदावर लिहू द्या किंवा चित्र काढू द्या आणि त्यांना प्रोत्साहन द्या की देवबरोबर काही वेळ घालवावी. प्रथम ते देवाबरोबर 2 मिनीट ह्या सारखे साधे असू शकते, मग ते वाढू शकते.

## शाही मेजवानी 5

***सिंह***



***घटकः***

- तुमच्या आवडीचे पिवळे फळ (पाइनॲपल किंवा आंबा इ)
- नारंगी फळ किंवा भाजी (संत्रीच्या फोडी किंवा गाजराचे काप)
- केळीचा तुकडा (कानांसाठी)
- सुरी
- ब्लू बेरी किंवा मनुके

***सूचना :***

1. सूरीने सिंहाच्या तोंडासाठी पिवळया फळाचा गोल कापा.
2. तुम्ही निवडलेल्या नारंगी फळ आणि/किंवा भाजी त्याची दाढी म्हणून ठेवा.
3. कान तयार करण्यासाठी केळीचे काप ठेवा.
4. सिंहाचे डोळे तयार करण्यासाठी ब्लू बेरी किंवा मनुके ठेवा.
5. त्याच्या मिश्या तयार करण्यासाठी गाजराचे तुकडे ठेवा.

***तयार! आता आपण दानीएलासारखे साहसी असलो पाहिजे ह्याची आठवण ठेवीत हा रूचकर सिंह खा.***

## बागेतील खेळ 5

### ***चेहरे आणि हावभाव***



लहान कागदावर व्हीबीएसच्या पवित्र शास्त्रातील पात्रांची नावे लिहा, जसे दानीएल, एस्तेर, नबुखद्नेस्सर राजा, आग, सिंह इ. कागदाचे तुकडे एका भांडयात ठेवा. मुलांचे दोन संघ तयार करा. प्रत्येक संघाचा एक प्रतिनिधी अभिनय करण्यासाठी मंचावर येतो. ते काय करणार हे पाहण्यासाठी एक कागद काढा. काहीही न बोलता किंवा आवाज न करता ते दोन मुलं त्या वस्तू सारखे किंवा पात्रांसारखे अभिनय करतील आणि इतर मुलांनी ओळखावे ते काय किंवा कोण आहे. अभिनय करणारे पात्र बदलून खेळ पुन्हा खेळा. जो संघ सर्वात ज्यास्त ओळखेल तो जिंकेल.

### ***कपाचा मिनार***



मुलांचे संघ तयार करा आणि प्रत्येक संघातून खेळण्यासाठी एक प्रतिनिधी पाठवा. प्रत्येक खेळाडूला सारखे प्लास्टिकचे कप द्या आणि त्यांच्या डोळयावर पट्टी बांधा. डोळे बांधले असतांना खेळाडूने मिनर बांधले पाहिजे. जर त्याचे मिनार पडले तर खेळाडू हारेल. ज्या खेळाडूचे मिनार न पडता आधी पूर्ण होईल तो जिंकेल.